सत्यमेव जयते

# नागरिकांची सनद

# पशुसंवर्धन आयुक्तालय महाराष्ट्र राज्य, औंध, पुणे–६७

## अनुक्रमणिका


| अ.क्र | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | **परिशिष्ट-१**<br>प्रस्तावना | ३ |
| २ | **परिशिष्ट-२**<br>अधिकाऱ्यांची यादी व संपर्क दुरध्वनी | ४-११ |
| ३ | **परिशिष्ट-३**<br>केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम, २००५ अन्वये नियुक्त केलेले शासकीय जन माहिती अधिकारी/सहाय्यक शासकीय माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचा तपशील | १२-१३ |
| ४ | **परिशिष्ट-४**<br>विभाग व विभागांतर्गत क्षेत्रिय कार्यालयांची रचना व संरचना तक्ता | १४-१६ |
| ५ | **परिशिष्ट-५**<br>पशुसंवर्धन खात्याची शतकातील वाटचाल. | १७-१९ |
| ६ | **परिशिष्‌ट-६**<br>पशुसंवर्धन विभागाची कार्यपध्दती/ कामाचे स्वरुप | २०-३८ |
| ७ | **परिशिष्ट-७**<br>अधिनियम आणि कायदे | ३९-४० |
| ८ | **परिशिष्ट-८**<br>पशुवैद्यकीय सेवा व पशुआरोग्य | ४१-४६ |
| ९ | **परिशिष्ट-९**<br>पशुसंवर्धन विभागामार्फत उपलब्ध होणा-या स:शुल्क सेवा | ४७-६२ |

# परिशिष्ट-१

## प्रस्तावना

पशुसंवर्धन विभागातील कार्य लोकाभिमुख असून पशुसंवर्धनाव्दारे राष्ट्रीय संपत्तीत वाढ करणे व त्याअनुषंगाने पशुसंवर्धनावर आधारीत रोजगार निर्मिती करणे हे ढोबळ मानाने अपेक्षित कार्य आहे. यासाठी पशुसंवर्धनाच्या विविध नविनतम तंत्रज्ञानाचा उपयोग करुन पशुजन्य पदार्थात वाढ घडवून आणण्याचा हेतू आहे. हयासाठी गायी, म्हशी, शेळया, मेंढया व कोंबडया यांच्या स्थानिक जातीत अनुवंशिक सुधारणा घडवून आणणे. तसेच पशुजन्य पदार्थ उदा. दुध, अंडी, मांस, लोकर, चामडी इत्यादीच्या वाढीसाठी अनुवंशिक शास्त्राच्या आधारे गुणवत्ता पुर्वक संपूर्ण् वाढ करणे अभिप्रेत आहे. त्या दृष्टीने राज्यात पशुसंवर्धन विभागाचे संघटन केले आहे.

पशुसंवर्धन खात्याची स्थापना झाली त्यावेळेस घोडयांची पैदास व जनावरांचे आरोग्य हे प्रमुख उद्दिष्ट होते. याचा फायदा विशिष्ट क्षेत्रापुरता मर्यादित होता. या विभागाच्या स्थापनेनंतर बरीच स्थित्यंतरे घडुन खात्याच्या प्रमुख कार्यात केवळ जनावरांच्या आजादासंबंधी उपचार करण्यापूरते मर्यादित न रहाता पशुधनाची अनुवंशीक सुधारणा करणे जास्त दुध उत्पादन, अंडी उत्पादन, मांस लोकर उत्पादन मिळवणे व त्या अनुषंगाने पशुसंगोपन व पशुपैदाशीची माहिती प्रशिक्षणाव्दारे पशुपालकांना देऊन, रोजगार निर्मिती करुन याव्दारे तळागाळातील लोकांचा विकास करणे हे प्रमुख कार्य ठरते. त्यामुळे आता या खात्यामार्फत दिली जाणारी सेवा खेडयापाडयापासून गरिबांच्या झोपडी पर्यंत जाऊन पोहोचली आहे.

पशुसंवर्धन व्यवसाय हा शेतीला पुरक असा आहे. शेतीचे काम ठराविक कालावधीत असते, व उर्वरित काळात त्यांना उद्योग मिळू शकत नाही. पशुसंवर्धन व्यवसायामुळे शेतक-यांना आता बारा ही महिने पुरक व्यवसाय मिळणे शक्य असल्याने तसेच आपला आहार सकस व संतुलित असण्याच्या दृष्टीने दुध, अंडी व मांस अशासारखी पशुजन्य उत्पादने आवश्यक असल्याने पशुसंवर्धन जोडधंदा ऐवजी मुख्य व्यवसाय म्हणुन पाहात आहे. त्यादृष्टीने पशुसंवर्धन खात्याने कुक्कुट पालन, संकरीत गायीची पैदास, ओढ कामासाठी स्थानिक जातीच्या गोवंशामध्ये सुधारणा, शेळी, मेंढी विकास या कार्यक्रमावर भर देऊन शेतक-यांना आणि आर्थिक दुर्बल घटकातील लोकांचा तसेच सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार उपलब्ध होण्याच्या दृष्टीने पशुसंवर्धन खात्याने यावर लक्ष केंद्रीत केले आहे.

कृषी,पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग या प्रशासकीय विभागाच्या सचिव (पदुम) यांच्या नियंत्रणाखाली विभागप्रमुख या नात्याने आयुक्त पशुसंवर्धन यांच्या प्रशासकीय नियंत्रण व निर्देशनाने पशुसंवर्धन विभागाचे काम एकूण-७ विभागामध्ये करण्यात येत आहे. (मुंबई/ नाशिक/ पुणे/ औरंगाबाद/ लातूर/ नागपूर/ अमरावती) कार्यान्वयन यंत्रणेचे विविध स्तर खालीलप्रमाणे आहेत. :-

आयुक्त पशुसंवर्धन (राज्यस्तर)
↓
प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त (विभागीयस्तर)
↓
जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त (जिल्हास्तर)
↓
सहायक आयुक्त पशुसंवर्धन (तालूका स्तर)

परिशिष्ट-२

## अधिकाऱ्यांची यादी व संपर्क दुरध्वनी

| Sr No | Officer Name | Address | Telephone No | Mobile No | Email id |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Dr. Satish Raju, Maharashtra Livestock Development, Board, Nagpur | Bull Rearing Center Campus, Near Bada Hanuman Temple,Civil Lines, Telangkhedi,Nagpur-440001 | 0724-2453588, 2453688, 2453788 | 9730010415, 9021399508 | ceomldbnagpur@gmail.com |
| 2 | Dr. Sunil Pasrate M.D. Punyashlok Ahilyadevi Sheli Mendhi Vikas Mahamandal, Pune | Gokhalenagar, Pune-16 | 020 -25657112 | 9967837477 | mdsagpune@gmail.com |
| 1 | Dr. Santosh Panchpor Regional Joint Commissioner of Animal Husbandry, Pune Region,Pune | Opp. Spicer College, Bhau Patil Road, Aundh ,Pune-411 007 | 020-25690486 020-25690500 | 9423861866 | rjcahpune@gmail.com |
| 2 | Dr. Prashant Kamble Regional Joint Commissioner of Animal Husbandry, Mumbai Region, Mumbai | Arey Colony, Goregaon, Mumbai-65 | 022-26856003 | 9967740664 | rjcmumbai@gmail.com |
| 3 | Dr. Baburao Narwade Regional Joint Commissioner of Animal Husbandry, Nashik Region, Nashik | Ashok stambh, Gangapur Road, Nashik-422 002 | 0253-2577015 | 9763332876 9860672623 | rjcnashik@gmail.com |
| 4 | Dr Sanjay Gaikwad Regional Joint Commissioner of Animal Husbandry, Aurangabad Region, Aurangabad | Khadakeshwar, Veterinary Polyclinic Campus, Aurangabad-431 001 | 0240-2331380, 0240-2364343 | 9822318248 | rjcaurangabad@gmail.com |
| 5 | Dr. Nana Arjun Sonawane Regional Joint Commissioner of Animal Husbandry, Latur Region, Latur | Shamnagar, Latur-413 531 | 02382-244179, 02382-252415 | 9423300767 | rjclatur@gmail.com |
| 6 | Dr. Satish Raju, Regional Joint Commissioner of Animal Husbandry, Nagpur Region, Nagpur | Near Udyog Bhavan,Civil Lines,Nagpur- 440 001 | 0712-2564983 | 9730010415, 9021399508 | rjcnagpur@gmail.com |
| 7 | Dr. Sanjay Kavre (Addl charge) Regional Joint Commissioner of Animal Husbandry, Amrawati Region, Amrawati | Behind Prabhat Talkies,Near Tahashil Office,Amrawati- 444 601 | 0721-2569648 | 9881583623 | rjcamraoti@gmail.com |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 8 | Dr. Y. A. Pathan Joint (Additional Charge), Joint Commissioner of Animal Husbandry,Institute of Veterinary Biological Products,Pune. | GaneshKhind Road,Aundh,Pune 411 007 | 020-25695632, 020-25697962 | 9423324609 | ivbp.pune@gmail.com |
| 9 | Dr. Y. A. Pathan Joint Commissioner of Animal Husbandry, Disease Investigation Section,Pune | GaneshKhind Road,Aundh,Pune 411 007 | 020-25692135 | 020-25691474 | 9423324609 |

| Sr. No | District Level Office Name | District | Office Address | Phone No. | Mobile Number | Email id |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Dr. Parihar Ankush Tulshiram District Deputy Commissioner, Animal Husbandry | Pune | Pune Mumbai Highway, Khadki Pune 411 003, | 020-25813887 | 9423333375 | ddcahpune@gmail.com |
| 2 | Dr. Dinkar Boarde District Deputy Commissioner, Animal Husbandry | Satara | Oppo. Rajiv Gandhi Hotel ,Godoli, Satara | 02162-221907 | 9423333374 | ddcahsatara@gmail.com |
| 3 | Dr. Vallabh Joshi District Deputy Commissioner, Animal Husbandry | Thane | Topiwala college, Mulund (W) Mumbai-80 | 022-25603311 | 9404225846 | ddcahthane@gmail.com |
| 4 | Dr. Ajaynath Thore District Deputy Commissioner, Animal Husbandry | Sangli (H.Q.Miraj ) | Dr.Ambedkar Rose, Zaribag, Miraj, Dist.Sangli | 0233-2222233 | 7588166703 | ddcahsangli@gmail.com |
| 5 | Dr. Bhuvnesh Borkar District Deputy Commissioner, Animal Husbandry | Palghar | Surya Colony, Palghar | - | 9011335368 | dccahpalghar@gmail.com |
| 6 | Dr. Samir Borkar District Deputy Commissioner, Animal Husbandry | Solapur | Near Dayanand College, Solapur | 0217-2342696, 2302696 | 9158840095 | ddcahsolapur@gmail.com |
| 7 | Dr. M. Shinde District Deputy Commissioner, Animal Husbandry | Kolhapur | Near Rescourse Naka, Mangalwar Peth, Kolhapur, | 0231-2622782 | 9011715544 | ddcahkolhapur@gmail.com |
| 8 | Dr. Sachin Deshpande District Deputy Commissioner, Animal Husbandry (Addl. Charge) | Raigad (Alibag) | Near Pranayam Health, varsoli Road ,Raigad (Alibag) | 02141-228036 | 7972901317 | ddcahraigad1@gmail.com |
| 9 | Dr. Dhananjay Shivajirao Jagdale District Deputy Commissioner, Animal Husbandry | Ratnagiri (Chiplun) | Kalambste, Ratnagiri(Chiplun) | 02355-256107 | 9767651589, 9423336143 | ddcahratnagiri@gmail.com |
| 10 | Dr. Atul Dangore District Deputy Commissioner, Animal Husbandry | Sindhudurg (Oras) | Zilla Parishad Central Administrative Building, Oros, Sindhurgnagari | 02362-228808 | 9403138940 | ddcahsindhudurg@gmail.com |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 11 | Dr. Shamkant Patil District Deputy Commissioner, Animal Husbandry | Jalgaon | Mahabal Coloney, Jalgaon | 0257-2262808 | 8149572495 | ddcahjalgaon@gmail.com |
| 12 | Dr. Milind Bhange District Deputy Commissioner, Animal Husbandry | Dhule | Parola Road, Dhule | 02562-230652 | --- | ddcahdhule@gmail.com |
| 13 | Dr. S. K. Tumbhare District Deputy Commissioner, Animal Husbandry | Ahmadnag ar | Manmad Pune Road, Near Old S.T.Stand, Ahmadnagar | 0241-2471322 | 7588541292, 8208762843 | ddcahnagar@gmail.com |
| 14 | Dr. Girish Patil District Deputy Commissioner, Animal Husbandry (Addl.Charge) | Nasik | Ashok Stambh,Gangapur Road, Nashik-2 | 0253-2579606 | 9850031627 | ddcahnashik@gmail.com |
| 15 | Dr.Umesh Devidas Patil District Deputy Commissioner, Animal Husbandry | Nanudurba r | Administrative Building in Collector Office | 02564-210016 | 9421884955 | ddcnandurbar@gmail.com |
| 16 | Dr. Pradip Zod District Deputy Commissioner, Animal Husbandry | Aurangaba d | Khadkeshwar, Aurangabad | 0240-2343260 | 8888672927 | ddcahaurangabad@gmail.com |
| 17 | Dr. P.P. Nemade District Deputy Commissioner, Animal Husbandry | Parbhani | Administrative Building, Shivajinagar, Parbhani | 02452-220388 | 9960181144 | ddcahparbhani@gmail.com |
| 18 | Dr. R. D. Kadam, Deputy Commissioner, Animal Husbandry | Beed | Veterinary Polyclinic, Subhash Road, Beed | 02442-222813 | 9421392230 | ddcahbeed@gmail.com |
| 19 | Dr. Kaware Sanjay M District Deputy Commissioner, Animal Husbandry | Amravati | Tapowan Road, Amaravati | 0721-2662326 | 9881583623 | dccahamravati@gmail.com |
| 20 | Dr. Amitkumar Dube District Deputy Commissioner, Animal Husbandry | Buldhana | Sangam chowk ,Buldhana | 07262-242682 | 9421208322 | dccahbuldhana@gmail.com |
| 21 | Dr. Jagadish Bukatare District Deputy Commissioner, Animal Husbandry | Akola | Near Panchayat Samiti, Akola | 0724-2433991 | 9730456747 | dccahakola@gmail.com |
| 22 | Dr. Rajendra Alone District Deputy Commissioner, Animal Husbandry (Additional Charge) | Yawatmal | Near Hanuman Akhada, Chandni Chowk, Yawatmal | 07232-243364 | 9423123234, 9403027036 | dccahyeotmal@gmail.com |
| 23 | Dr. Arun Yadgire (Additional Charge) District Deputy Commissioner, Animal Husbandry | Washim | Civil Line, Chikhali-Survey Road ,Washim | 07252-234036 | 9527297066 | dccahwashim@gmail.com |
| 24 | Dr. Manjusha Pundlik District Deputy Commissioner, Animal Husbandry | Nagpur | Seminary Hills. Nagpur | 0712-2511621 | 9511679397 | nagpurddcah@gmail.com |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 25 | Dr. P.G. Borkar, District Deputy Commissioner, Animal Husbandry | Wardha | Shivaji Chowk, Wardha | 07152-243687 | 9422128296, 8208613239 | ddcahwrd@gmail.com |
| 26 | Dr. Y. S. Wanjari District Deputy Commissioner, Animal Husbandry | Bhandara | Bada Bajar, Bhandara | 07184-252413 | 9421710277 | ddcah.bhandara1@gmail.com |
| 27 | Dr. Mangesh Kale District Deputy Commissioner, Animal Husbandry | Chandrapu r | Nagina Bag, Chandrapur | 07172-253182 | 9850361026 | ddcah.chandrapur@gmail.com |
| 28 | Dr. Jalindar Titme (Add. Charge) District Deputy Commissioner, Animal Husbandry | Gondia | Gondia (Kudawa) Shivaji Chowk, Gondia | 07182-250438 | 7350841791 | ddcah.gondia@gmail.com |
| 29 | Dr. Vilas Gadge District Deputy Commissioner, Animal Husbandry | Gadchiroli | Near Post Office, Charmoshi Road, Gadchiroli | 07132-233361 | 8956209455 | ddcah.gadchiroli@gmail.com |
| 30 | Dr. N.S.Kadam District Deputy Commissioner, Animal Husbandry | Latur | Shyamnagar, Behind S.P. Office, Latur | 02382 - 242873 | 9423791261, 7499808744 | ddcahlatur@gmail.com |
| 31 | Dr. Rajkumar Padile District Deputy Commissioner, Animal Husbandry | Nanded | Yashodeep Building, Near ITI, Nanded | 02462-253845 | 8275055672 8208730511 | ddcahnanded@gmail.com |
| 32 | Dr. G. M. Hulsure District Deputy Commissioner, Animal Husbandry | Osmanaba d | Ramnagar, Osmanabad | 02472-222648 | 9422873510 | ddcahosmanabad@gmail.com |
| 33 | Dr. M.R. Ratnaparakhi District Deputy Commissioner, Animal Husbandry | Hingoli | New Administrative Building, Hingoli | 02456-222334 | 9970414329, 9730826980 | dccahhingoli@gmail.com |
| 34 | Dr. Digamber Kamble, District Deputy Commissioner, Animal Husbandry | Jalna | Jalna | 02482 - 224106 | 9890350346 | ddcahjalna@gmail.com |
| 35 | Dr. Shailesh Pethe Deputy Commisioner, Quality Control Lab, Goregaon, Mumbai-65 | Deputy Commisio ner, Quality Control Lab, Goregaon, Mumbai- 65 | (022) 29272422 | 9821073318 | fax no.(022) 29272422 | ddcahmumbai@gmail.com |

| Sr. No | ZP Level Office Name (DAHO) | District | Office Address | Phone No. | Mobile Number | Email id |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Dr. V. D. Garje District Animal Husbandry Officer | Pune | Jilha Parishad Pune- 411 001 | 020-26131799 | 9822455841 | dahopune@gmail.com |
| 2 | Dr. V. K. Pawar District Animal Husbandry Office | Satara | Zilla Parishad Satara, Satara Koregaon Road, Sadarbazar Satara - 415001 | 02162-233793 | 9890920482 | dahozpsatara@gmail.com |
| 3 | Dr Harun Pathan District Animal Husbandry Officer | Sangli (H.Q.Miraj ) | Zilha Parishad Sangli Sangli Miraj road -416 416 | 0233-2375108 | 9763721200 | dahozpsangli@gmail.com |
| 4 | Dr.Navnath L. Narale District Animal Husbandry Officer | Solapur | Zilha Parishad solapur, Railway line opp.congress Bhavan solapur-413 003 | 0217-2726073 | 9067422142 | dahozpsolapur@gmail.com |
| 5 | Dr. Pramod Babar District Animal Husbandry Officer | Kolhapur | Zilha Parishad Kolhapur Nagala park Near collector office, Kolhapur 416 003 | 0231-2652331 | 8530835035 | dahokolhapur1@gmail.com |
| 6 | Dr. Shamrao Kadam, District Animal Husbandry Officer | Raigad (Alibag) | Zilha parishad Raigad, Tal-Alibaug, Dist-Raigad | 02141-222048 | 7588383169, 9423803507 | dahoraigad@gmail.com |
| 7 | Dr. Ramchandra Narute District Animal Husbandry Officer | Ratnagiri (Chiplun) | Dr.Babasaheb Ambedkar Bhavan, Zilha Parishad Ratnagiri , Tal-Ratnagiri, Dist-Ratnagiri | 02355-222298 | 9763707892 | dahoratnagiri@gmail.com |
| 8 | Dr. Sudhakar Thakur (Additional Charge) District Animal Husbandry Officer | Sindhudurg (Oras) | Zilha Parishad Sindhudurg , Compound Oros, Tal-kudal , Dist-Sindhudurg | 02362-228719 | 9850780070 | dahosindhudurg@gmail.com |
| 9 | Dr. Sameer Todankar District Animal Husbandry Officer | Thane | Collector Compound, near Treasury Office, Tal-Thane, Dist-Thane | 022-25341051 | 9967457992 | dahothane@gmail.com |
| 10 | Dr. Vahed Tadvi (Addi. Charge) District Animal Husbandry Officer | Jalgaon | Zilla Parishad Old Building, Jalgaon | 0257 - 2232297 | 9823683704 | dahojalgaon11@gmail.com |
| 11 | Dr Rajendra Langhe District Animal Husbandry Officer | Dhule | Near Collector Office, Zilla Parishad, Dhule | 02562 - 238214 | 9822290228 | dahodhule1@gmail.com |
| 12 | Dr. Dighe District Animal Husbandry Officer | Ahmadnagar | Zilla Parishad, Ahmednagar | 0241 - 2353697 | 9822515035 | dahonagar@gmail.com |
| 13 | Dr. Sanjay Shinde District Animal | Nashik | Ashok Stambh,Gangapur | 0253-2590279 | 7588063322, 9158521000 | dahonashik@gmail.com |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | Husbandry Officer | | Road, Nashik-2 | | | |
| 14 | Dr. Ashok Valvi (Additional Charge) District Animal Husbandry Officer | Nandurbar | Administrative Building in Collector Office | 02564 - 210236 | 82082 82988 | dahonandurbar@gmail.com |
| 15 | Dr Surekha Mane District Animal Husbandry Officer | Aurangabad | Zilla Parishad, Aurangabad | 0240-2345483 | 9527707230 | dahoaurangabad@gmail.com |
| 16 | Dr. Dhavale (Additional Charge) District Animal Husbandry Officer | Jalana | Zilla Parishad ,Jalana | 02482-224693, 225307 | 8624840646 | dahojalna@gmail.com |
| 17 | Dr. Aghav District Animal Husbandry Officer | Parbhani | Zilla Parishad , Near shani mandir, Parbhani | 02452-220486 | 9420653083 | dahoparbhani@gmail.com |
| 18 | Dr.Vijay Bhaskarrao Deshmukh District Animal Husbandry Officer | Beed | Zilla Parishad , Beed | 02442-222392 | 9421321272 | dahobeed@gmail.com |
| 19 | Dr. Solanki District Animal Husbandry Officer | Amravati | Zilla Parishad, Amaravati | 0721- 2662066 | 9403720501 | dahoamravati@gmail.com |
| 20 | Dr. Lone District Animal Husbandry Officer | Buldhana | Zilla Parishad,Buldhana | 07262-242438 | 8329122297 | dahobuldhana@gmail.com |
| 21 | Dr Santosh Arbat District Animal Husbandry Officer | Akola | Zilla Parishad,Akola | 0724-2434865 | 9422919796 | dahoakola@gmail.com |
| 22 | Dr. Kranti Katole District Animal Husbandry Officer | Yawatmal | Zilla Parishad,Yawatmal | 07232-242203 | 7888036271 | dahoyeotmal@gmail.com |
| 23 | Dr. Balu Deshmukh District Animal Husbandry Officer | Washim | Zilla Parishad,Washim | 07252-235473 | 7262081986 | dahowashim@gmail.com |
| 24 | Dr. Kavita More District Animal Husbandry Officer | Nagpur | Zilla Parishad , Civil Lines, Nagpur | 0712-2560150 | 7588630888 | dahozp.nagpur@gmail.com |
| 25 | Dr. Beedkar District Animal Husbandry Officer | Wardha | Zilla Parishad, Near Magan Sagrahalaya , Ramnagar , Wardha | 07152-245134 | 7249593344 | wardha.daho@gmail.com |
| 26 | Dr. Subodh Nanda Gavli District Animal Husbandry Officer | Bhandara | Zilla Parishad, Bhandara | 07184-251592 | 9970283011 | dahobhandara@gmail.com |
| 27 | Dr. Hirudkar District Animal Husbandry Officer | Chandrapur | Zilla Parishad, Chandrapur | 07172-260177 | 9423104814 | dahozp.chandrapur@gmail.com |
| 28 | Dr.Kantilal Patle District Animal Husbandry Officer | Gondia | Zilla Parishad , Fultur Road , Gondia | 07182-234131 | 9423113971 | dahozpgondia1@gmail.com |
| 29 | Dr. Kumbhre Suresh District Animal Husbandry Officer | Gadchiroli | Zilla Parishad, Gadchiroli | 07132-222235 | 9421808267 | dahozp.gadchiroli@gmail.com |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 30 | Dr S. G. Shinde District Animal Husbandry Officer | Latur | Zilla Parishad, Latur | 02382-258664 | 9422968151 | daholatur11@gmail.com |
| 31 | Dr. B.U.Bodhankar District Animal Husbandry Officer | Nanded | Zilla Parishad, Nanded | 02462-234010 | 9819462220, 9167084555 | dahonanded@gmail.com |
| 32 | Dr. Yatin Pujari District Animal Husbandry Officer | Osmanaba d | Zilla Parishad, Osmanabad | 02472-223944 | 9822897723 | dahoosmanabad@gmail.com , |
| 33 | Dr. Sakharam Khune District Animal Husbandry Officer | Hingoli | Zilla Parishad, Hingoli | 02456-223582 | - | dahozphingoli@gmail.com |
| 34 | Dr. Prakash Hasnalkar District Animal Husbandry Officer | Palghar | Palghar | 02525-257990 | 9423565060 | dahopalghar@gmail.com |

| Sr. No | Commissioner office level | office | Office Address | Phone No. | Mobile Number | Email id |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Kaushtubh Diwegaonkar Commissioner of Animal Husbandry | Commissionerate of Animal Husbandry, Maharashtra State, Pune - 07 | Opposite Spicer College, Aundh | 020-25690483 | 9405385592 | cahpune@gmail.com |
| 2 | Dr. Shitalkumar Mahadev Mukane Additional Commissioner of Animal Husbandry | Commissionerate of Animal Husbandry, Maharashtra State, Pune - 07 | Opposite Spicer College, Aundh | 020-25690489 | 8888374444 | cah.addcomm@gmail.co m |
| 3 | Shri. Prakash Ahirrao (HQ-Additional Charge) | Commissionerate of Animal Husbandry, Maharashtra State, Pune - 07 | Opposite Spicer College, Aundh | 020-25690489 | 9422935130 | cah.jchq@gmail.com |
| 4 | Dr.Devendra Jadhav Deputy Commissioner of Animal Husbandry, Disease Control | Commissionerate of Animal Husbandry, Maharashtra State, Pune - 07 | Opposite Spicer College, Aundh | 020-25690489 | 9921114103 | cah.diseasecontrol@ gmail.com |
| 5 | Dr. Shailesh Kende Deputy Commissioner of Animal Husbandry, Planning and Budget | Commissionerate of Animal Husbandry, Maharashtra State, Pune - 07 | Opposite Spicer College, Aundh | 020-25690489 | 8830176019 | cah.planning@gmail.com |
| 6 | Dr. Prashant Bhad Deputy Commissioner of Animal Husbandry, Livestock & Poultry | Commissionerate of Animal Husbandry, Maharashtra State, Pune - 07 | Opposite Spicer College, Aundh | 020-25690489 | 9552545232 | cah.livestockandpoultry@ gmail.com |
| 7 | Smt. Sushma Jadhav, Joint Director ( Statistics) | Commissionerate of Animal Husbandry, Maharashtra State, Pune - 07 | Opposite Spicer College, Aundh | 020-25690489 | 9423842939 | cah.statistics@gmail.com |
| 8 | Mona Pawar, Deputy (Additional Charge) Director (Statistics) | Commissionerate of Animal Husbandry, Maharashtra State, Pune - 07 | Opposite Spicer College, Aundh | 020-25690489 | 9665905284 | cah.statistics@gmail.com |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 9 | Shri.Ganesh Deshpande Deputy Director (Fodder Development) | Commissionerate of Animal Husbandry, Maharashtra State, Pune - 07 | Opposite Spicer College, Aundh | 020-25690489 | 9623641856 | ddfoddercah@gmail.com |
| 10 | Dr. Bipin Patil, Integrated Sample Survey Scheme | Commissionerate of Animal Husbandry, Maharashtra State, Pune - 07 | Opposite Spicer College, Aundh | 020-25690489 | 9822841428 | acahiss@rediffmail.com |
| 11 | Dr. Deepali Kulkarni ITHUB Co-ordinator | Commissionerate of Animal Husbandry, Maharashtra State, Pune - 07 | Opposite Spicer College, Aundh | 020-25690489 | 8888890263 | cah.ithub-mh@gov.in |

## परिशिष्ट-३

केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम, २००५ अन्वये नियुक्त केलेले शासकीय जन माहिती अधिकारी/सहाय्यक शासकीय माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचा तपशील


आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे ४११ ०६७ यांचे कार्यालय.


| कार्यासन क्रमांक | सहाय्यक जन माहिती अधिकारी | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी |
|---|---|---|---|
| पसं- १ | अधिक्षक | प्रशासन अधिकारी | सहआयुक्त पशुसवंर्धन (मु) आयुक्त पशुसंवर्धन महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचे कार्यालय |
| पसं- २ | अधिक्षक | वरिष्ठ.प्रशासन अधिकारी | |
| पसं-३,४, ८,९ | अधिक्षक ३,४,८ | संघटन व कार्यपध्दती अधिकारी | |
| पसं-५ | लेखाधिकारी | सहाय्यक संचालक(लेखा) | |
| पसं-६ | सहा.आयुक्त पशुसंवर्धन (नियोजन व अंदाज) | उपआयुक्त पशुसवंर्धन (नियोजन व अंदाज) | अति.आयुक्त पशुसंवर्धन महाराष्ट्र राज्य, पुणे-१ |
| पसं-७ | प्रशासन अध्किारी (लेखामेळ व निर्धारण) | सहाय्यक संचालक(लेखा) | सहआयुक्त पशुसवंर्धन (मु) आयुक्त पशुसंवर्धन महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचे कार्यालय |
| पसं-१० | लेखा परिक्षण अधिकारी | सहाय्यक संचालक(लेखा) | |
| पसं-११ | संशोधन अधिकारी | उपसंचालक (सांख्यिकी) | अति.आयुक्त पशुसंवर्धन महाराष्ट्र राज्य, पुणे-१ |
| पसं-१२ | सहा.आयुक्त पशुसंवर्धन (रोगनियंत्रण) | उपआयुक्त पशुसंवर्धन (रोगनियंत्रण) | |
| पसं-१३ | १) सहा.आयुक्त पशुसंवर्धन (विस्तार व पशुधन)<br>२) सहा.आयुक्त पशुसंवर्धन (कुक्कुट व प्रशिक्षण) | उपआयुक्त पशुसंवर्धन (पशुधन व कुक्कुट) | |
| पसं-१४ | सहा.संचालक (वैरणविकास) | उपसंचालक पशुसंवर्धन (वैरणविकास) | |

आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत कार्यालये.

| कार्यालयाचे नांव | सहाय्यक जन माहिती अधिकारी | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी |
|---|---|---|---|
| पशुवैद्यकीय जैव पदार्थ निर्मिती संस्था, पुणे | प्रशासन अधिकारी, पशुवैद्यकीय जैव पदार्थ निर्मिती संस्था, पुणे . | उपआयुक्त पशुसंवर्धन (जिवाणु लस निर्मिती) पशुवैद्यकीय जैव पदार्थ निर्मिती संस्था, पुणे . | सहआयुक्त पशुसंवर्धन पशुवैद्यकीय जैव पदार्थ निर्मिती संस्था, पुणे . |
| रोग अन्वेषण विभाग,पुणे | प्रशासन अधिकारी रोग अन्वेषण विभाग,पुणे | उपआयुक्त पशुसंवर्धन (कुक्कुट रोग) रोग अन्वेषण विभाग,पुणे | सहआयुक्त पशुसंवर्धन रोग अन्वेषण विभाग,पुणे |
| प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त (सर्व कार्यालये) | प्रशासन अधिकारी प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त (सर्व कार्यालये) | सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त (सर्व कार्यालये) | प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त (सर्व) |
| जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त (सर्व कार्यालये) | सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त (सर्व कार्यालये) | जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त (सर्व कार्यालये) | संबंधित प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त (सर्व) |
| गुणनियंत्रण प्रयोगशाळा, गोरेगांव, मुंबई | प्रशासन अधिकारी, गुणनियंत्रण प्रयोगशाळा, गोरेगांव, मुंबई | पशुसंवर्धन उपआयुक्त, गुणनियंत्रण प्रयोगशाळा, गोरेगांव, मुंबई | प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त, मुंबई |
| एकात्मिक पाहणी योजना, पुणे | सांख्यिकी अन्वेषक एकात्मिक पाहणी योजना, पुणे | सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन एकात्मिक पाहणी योजना, पुणे | उपसंचालक (सांख्यिकी) आयुक्त पशुसंवर्धन, म.रा. पुणे-१, यांचे कार्यालय |
| राज्यस्तरीय प्रशिक्ष्ंण केंद्र, पुणे | सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, राज्यस्तरीय प्रशिक्ष्ंण केंद्र, पुणे | प्राचार्य, राज्यस्तरीय प्रशिक्ष्ंण केंद्र, पुणे | सहआयुक्त पशुसवंर्धन(मु) आयुक्त पशुसंवर्धन महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचे कार्यालय |

परिशिष्ट-४ : विभाग व विभागांतर्गत क्षेत्रिय कार्यालयांची रचना व संरचना तक्ता




प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन (७)
प्रादेशिक स्तर
जिल्हा परिषद
जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त (३४)
जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी जि.प.(३४)
सहा. आयुक्त पशुसंवर्धन, विभागीय रोग अन्वेषण प्रयोगशाळा (७)
सहा. आयुक्त पशुसंवर्धन, जि. प. वै. स. चि. (३३)
सहा. आयुक्त पशुसंवर्धन ता.प.वै.स.चि. (१६९)
सहा. आयुक्त पशुसंवर्धन मध्यवर्ती अंडी उबवणी केंद्र (४)
प.वि.अ. तपासणी नाका (१३)
प.वि.अ. पवैद श्रेणी-१ (राज्यस्तरीय) (८५)
प.प./स. प.वि.अ. पवैद श्रेणी-२ (राज्यस्तरीय) (५८५)
प.वि.अ. (विस्तार) पंचायत समिती जि.प. (२९६)
प.वि.अ. पवैद श्रेणी-१ (जि.प.) (१६५७)
प.वि.अ. फिरते पवैद (६५)
प.प./स. प.वि.अ. पवैद श्रेणी-२ (जि.प.) (२२५६)

# पशुसंवर्धन विभाग: अर्थसंकल्प (रु.कोटीत)

| योजना | अर्थसंकल्पित तरतूद २०२१-२२ | बिडीएस वर वितरीत | खर्च | अर्थसंकल्पित तरतूद २०२२-२३ | बिडीएस वर वितरीत | खर्च | अर्थसंकल्पित तरतूद २०२३-२४ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| केंद्र पुरस्कृत योजना (Gen+SCP+TSP) | ८०.६ | ३५.१३ | ३२.६५ | ७०.३९ | १३.५२ | १२.७७ | १०८.४३ |
| राज्यस्तरीय योजना (Gen+SCP+TSP) | २२०.४ | २०८.३१ | २०२.८८ | ३९२.९८ | २२९.२६ | २२७.२८ | ३०१.५६ |
| जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण | ५५७.२२ | ५१४.३५ | ५१४.३५ | २४५.१४ | १७७.८९ | १६०.६६ | २३९.८२ |
| जि.वा.यो.विशेष घटक योजना | ९४.८९ | ६८.१३ | ६८.१३ | ७२.६२ | ६१.४६ | ५२.५८ | ८६.८२ |
| जि.वा.यो.आदिवासी उपयोजना | ३४.५५ | २७.९८ | २७.९८ | ३६.८५ | ३१.५६ | ३०.८२ | ३५.५६ |
| जि.वा.यो. आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजना | १५.०९ | १५.६१ | १५.६१ | १६.८४ | १२.५६ | १२.०२ | १७.१९ |
| एकूण योजनांतर्गत योजना | १००२.७५ | ८६९.५१ | ८६१.६ | ८३४.८२ | ५२६.२५ | ४९६.१३ | ७८९.३८ |
| योजनेतर योजना (अनिवार्य खर्च) | ११९०.५५ (Salary: ११०८.७२ + Contingency: ८१.८६) | १२०४.०८ (Salary: ११२२.७१ + Contingency: ८१.३८ ) | १०८२.३० (Salary: १००५.७८ + Contingency: ७६.५१) | १२६५.९१ (Salary: ११९८.७२ + Contingency : ६७.१९) | १२५४.९३ (Salary: ११७६.६९ + Contingency : ७८.२४) | ११९९.८३ (Salary: ११२४.७८ + Contingency : ७५.०५) | १३९५.२८ (Salary: १३१३.४९ + Contingency: ८१.७९) |
| **एकूण** | २१९३.३० | २०७३.५९ | १९४३.९० | २१००.७३ | १७८१.१८ | १६९५.९६ | २१८४.६६ |

परिशिष्ट-५

<u>पशुसंवर्धन खात्याची शतकातील वाटचाल.</u>

पशुसंवर्धन खात्याची सुरुवात २० मे,१८९२ मुंबई प्रांताकरिता **मुलकी पशुवैद्यक खाते** म्हणुन झालेली होती. मुलकी पशुवैद्यक खात्याकडे अश्व पैदास पशुरोग नियंत्रण आणि पशुवैद्यकीय अध्यापन याप्रमाणे ३ प्रधान कार्य सोपविली गेली.

कलकत्ता येथे १८८३ मध्ये एका शासन नियुक्त समितीने अखिल भारतीय पातळीवर मुलकी पशुवैद्यक खात्याची रचना व्हावी असे सुचविले. पशुवैद्यकीय अध्यापनासाठी मुंबई (परळ) येथे पशुवैद्यकीय महाविद्यालयाची स्थापना १८८६ मध्ये करण्यात आली.

त्यावेळी कृषि, अश्व व पशुबाबतची अद्यावत माहिती लोकांना होण्याच्या उद्देशाने कृषि, अश्व व पशुप्रदर्शने आयोजित करण्यात येत होती. पहिले कृषि, अश्‍व व पशुप्रदर्शन १८८५-८६ सालात दख्खन प्रांतात अहमदनगर येथे आयोजित करण्यात आले होते. प्रथम पशुवैद्यकीय दवाखान्याची निर्मिती १ एप्रिल, १८९२ रोजी धुळे व नाशिक जिल्हयात झाली. १९१८ मध्ये पशुपैदास कार्यक्रम कृषि खात्याकडे हस्तांतरीत करण्यात आला.

१९२४ मध्ये अश्व पैदास कार्यक्रम मुलकी पशुवैद्यक खात्याकडून वेगळे करुन खात्याकडे केवळ पशुरोग नियंत्रणाचे कार्य सोपविले होते. सन १९३२ पासून अखिल भारतीय कृषि अनुसंधान परिषदेच्या अनुदानाने पशुरोग अन्वेषण कार्य मुंबई येथील पशुवैद्यक महाविद्यालयात जोडून करण्यांत आले.

देशी गायी, गावठी गायी पासून सुधारित जातीच्या जनावरांची पैदास करण्याच्या उद्देशाने वळू योजना १९३१-३२ या वर्षापासून सुरु करण्यात आली. सदर योजनेअंतर्गत सुधारित देशी जातीच्या वळू पासून गावठी गायीशी संकर करुन सुधारित जातीची पैदास करण्यात येत असे. पशुसुधार करण्याच्या उद्देशाने दुसरी महत्वाची बाब म्हणजे उत्तम जातीच्या वळूंची वंशावळ तयार करुन, तसेच प्रमुख जातीच्या वळूंची नोंद करुन संपूर्ण माहिती ठेवण्यात येत असे.

सन १९३३ मध्ये मुंबई पशुसूधार कायदा करण्यात आला. या कायद्यान्वये पैदास वळू व्यतिरिक्त इतर सर्व वळूंचे खच्ची करणाचे अधिकार प्रदान करण्यात आले. कृषि अनुसंधान परिषदेतर्फे १९ ऑक्टोबर, १९३६ मध्ये खडकी जिल्हा पुणे येथे कुक्कुट पैदासीच्या संशोधनाकरिता आर्थिक तरतूद करण्यात आली, व व्हाईट लेग-हॉर्न, -होड अयलॅन्ड रेड, ब्लॅक मिनॉर्क जातीच्या विदेशी कोंबडया ठेवण्यात आल्या होत्या.

भारत सरकारच्या विद्यमानाने मे, १९३७ मध्ये पशुपालकांना सुधारित पशुंची पैदास करण्याच्या हेतुने जातीवंत वळू पुरविण्याची योजना सुरु करण्यात आली. या योजनेअंतर्गत सुधारित म्हशींची पैदास व वैरण विकास कार्यक्रमाचा सुध्दा समावेश करण्यात आला.

मुंबई अत्यावश्यक सामुग्री आणि पशु (नियंत्रण) कायदा १९४६ अन्वये उपयुक्त जनावरांच्या कत्तलीवर बंदी घालण्यात आली.

१९ जुलै, १९४७ मध्ये पशुवैद्यकीय जैवपदार्थ निर्मिती संस्था, पुणे येथे स्थापन करण्यात आली. या संस्थेमध्ये जनावरांच्या रोग प्रतिबंधक लसींचे उत्पादन केली जाते. मुंबई प्राणि संरक्षण कायदा १९४८ पासून लागू करण्यात आला. याच वर्षात रोग अन्वेषण कार्य राज्य शासनाकडे सुपूर्त करण्यात आला. सासंर्गिक पशुरोग नियंत्रणाच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी मुंबई सांसर्गिक पशुरोग (नियंत्रण) कायदा करण्यात आला. पशुरोग अन्वेषणाकरिता राज्यस्तर पुणे व विभागीय पातळीवर ६ ठिकाणी पशुरोग अन्वेषण प्रयोगशाळा स्थापन केलेले आहे. विभागीय पातळीवरील संस्थांना तांत्रिक बाबीसाठी पुणे येथील संस्था मार्गदर्शनही करते.

कृत्रिम रेतनाव्दारे पशुपैदास कार्यास सन १९४८ मध्ये मंजूरी प्राप्त झाली. परंतु प्रत्यक्ष कार्यास १९५० पासून पुणे येथे सरुवात झाली. जनावरांमध्ये दुग्ध उत्पादन वाढण्याच्या दृष्टीने देशी दुधाळ जातीच्या लालसिंधी, गीर व साहिवाल तसेच म्हैस वर्गात सुरती व मु-हा जातीच्या वळू / रेडयांचा कृत्रिम रेतनात वापर करुन पैदाशीव्दारे गावठी जनावरांमध्ये सुधारणा करण्याकरिता वापर करण्यात येऊ लागला. तसेच ओढ कामास व शेती कामात उपयुक्त खिल्लार जातीचे वळू पासून कृत्रिम रेतन करुन उत्कृष्ठ पैदास करण्यास सुरुवात करण्यांत आली.

कृत्रिम रेतन कार्यामध्ये सुरुवातीस द्रवविर्य वापरण्यात येत असे. दुग्ध उत्पादनात वाढ होण्याच्या दृष्टीने विदेशी दुधाळ जातीच्या होलस्टीन फ्रिजीयन व जर्सी जातीच्या वळू पासून गावठी गाईशी कृत्रिम रेतनाने संकर करुन संकरित गायीची पैदास करण्यास सन १९६७ मध्ये सुरुवात करण्यात आली. १९६८ पासून परदेशांतून आयात केलेल्या गोठविलेल्या रेतमात्रांचा उपयोग सुरु करण्यांत आला. गोठविलेले रेत वापरणे जास्त किफायतशीर व फलदायी असल्याने सन १९८० मध्ये पुणे येथे डॅनिडा मदतीखाली गोठीत रेत प्रयोगशाळा स्थापन करण्यांत आली. तसेच १९८५ मध्ये नागपूर येथे व १९९२ मध्ये औरंगाबाद येथे गोठीत रेत प्रयोगशाळा स्थापन करण्यांत आल्या.

मुंबई व्हेटरनरी प्रॅक्टीशनर्स ॲक्ट, १९५६ पासून लागू करण्यांत आला. कृषि खात्याशी संलग्नीत असलेल्या पशुसंवर्धन विभागाचे जुलै,१९५७ रोजी विभाजन करुन पशुसंवर्धन खाते असे नामभिदान आणि खातेप्रमुखाचे संचालक पशुसंवर्धन खाते असे संबोधन करण्यांत आले. तद्नंतर संचालकांच्या ऐवजी आयुक्त, पशुसंवर्धन खाते असे दि.५/११/१९९३ पासून संबोधण्यात येत आहे. मुंबई व्हेटरनरी कॉन्सीलची स्थापना १९५७ मध्ये करण्यांत आली. १ मे,१९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. लोकशाहीचे विकेंद्रीकरण १ मे,१९६२ रोजी करण्यात येऊन जिल्हा परिषद व पंचायत समित्यांची निर्मिती करण्यांत आली. पशुसंवर्धन खात्याच्या अखत्यारितील २० योजना जिल्हा परिषदांकडे हस्तांतरीत करण्यांत आल्या.

सन १९८४-८५ या वर्षी पशुसंवर्धन खात्याची प्रथमच पुनर्रचना करण्यांत आली. यात प्रामुख्याने सघन पशुसूधार प्रकल्प बंद करुन त्या योजनेखालील पदे इतरत्र वर्ग करुन जिल्हा पशुसंवर्धन

उपसंचालक कार्यालय हे जिल्हा स्तरावरील प्रशासकीय कार्यालय सुरु करण्यात आले, व विभागीय स्तरावर प्रादेशिक पशुसंवर्धन सहसंचालकाची पदे निर्माण केली तसेच तांत्रिक कामाचा वाढलेला व्याप सुलभपणे हाताळण्यासाठी पशुसंवर्धन संचालकांना (आयुक्त पशुसंवर्धन) सहाय्यक म्हणुन अतिरिक्त संचालक हे पद निर्माण करण्यांत आले व त्यांच्याकडे कृत्रिम रेतन, वळू मुल्यमापन इत्यादी तांत्रिक कामाच्या सनियंत्रणाची जबाबदारी सोपविण्यात आली. यावेळी राज्यात कार्यरत असलेली आठ सधन पशुसुधार प्रकल्पाची मुख्यालये बंद करुन तेथील उपसंचालकांची पदे जिल्हास्तरावर वर्ग करण्यांत आली. तालुकास्तरावरील पशुवैद्यकीय राजपत्रित अधिका-यांची पदे पशुवैद्यकीय दवाखान्यातून कमी करुन विभागीय कृत्रिम रेतन केंद्रांच्या मुख्यालयी वर्ग करण्यात आली, व कृत्रिम रेतन कार्यावर भर देण्यात आला.

पशुसंवर्धन विभागाचा दर्जावाढ करुन खात्याचे विभाग प्रमुख म्हणुन आयुक्त पशुसंवर्धन हे पद १९९३ साली निर्माण करण्यांत आले.

यानंतर वित्त विभागाच्या निर्देशानुसार पशुसंवर्धन विभागातील सर्व योजना / संस्था व कार्यालयातील मंजूर व कार्यान्वीत पदांचा आढावा घेऊन अनावश्यक योजना बंद करणे, उपलब्ध कर्मचारी वर्गातून नविन पशुवैद्यकीय संस्था निर्माण करुन पशुवैद्यकीय सेवा व सुविधांची व्याप्ती वाढविणे याकरिता पदांचे समायोजनासह पशुसंर्धन विभागाची वर्ष २००४ मध्ये पुनर्रचना करण्यांत आली. (शासन निर्ण्य पसंप्र-१००१/प्र.क्र.२९/(भाग-४)/पदुम-१, दि.२५ मे,२००४ व दि.३०/६/२००५ अन्वये)

पशुसंवर्धन विभागाच्या पुनर्रचने अंतर्गत अतिरिक्त ठरलेले एकूण १५२७ पदे निरास करण्यांत आली, आणि ११२३ पदांचे समायोजन करुन तालुकास्तरावर एकूण १७२ तालुका लघुपशुवैद्यकीय सर्वचिकित्सालये निर्माण करण्यांत आले. तसेच विभागाच्या एकूण ४३ योजनांपैकी ३४ योजना व त्याअंतर्गत एकूण ७६८४ पदे चालू ठेवण्यास शासनाने मान्यता दिली. तसेच समायोजनाव्दारे उपलब्ध मंजूर पदामधुन २०८ नविन पशुवैद्यकीय दवाखाने सुरु करण्यांत आली. समायोजनाव्दारे राज्यातील नवनिर्मित ४ जिल्हयांसाठी जिल्हा पशुसंवर्धन उपसंचालक व जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद ही पदे नविन कार्यालयासह निर्माण करण्यांत आली.

परिशिष्ट-६

## पशुसंवर्धन विभागाची कार्यपध्दती/ कामाचे स्वरुप

**संचालन** व प्रशासनासाठी आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, औंध, पुणे-४११ ०६७ हे कार्यालय पुणे येथे कार्यरत असून त्यांच्या अधिनस्त अतिरिक्त आयुक्त पशुसंवर्धन, सहआयुक्त पशुसंवर्धन (मुख्यालय), उपआयुक्त पशुसंवर्धन (नियोजन व अंदाज), उपआयुक्त पशुसंवर्धन (रोगनियंत्रण), उपआयुक्त पशुसंवर्धन (पशुधन विकास),व उपआयुक्त पशुसंवर्धन तथा पदसिध्द अवर सचिव (शासन स्तर) अशी यंत्रणा कार्यरत आहे.तसेच प्रादेशिक स्तरावर प्रत्येकी एक याप्रमाणे प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त यांची सात कार्यालये कार्यरत आहेत.संचालन व प्रशासन या अंतर्गत पशुसंवर्धन विभागाच्या विविध योजनांचे आराखडे तयार करणे, प्रस्तावीत योजनांची अंमलबजावणी जिल्हास्तरावर,तालुकास्तरावर व ग्रामस्तरावर कार्यरत असलेल्या संस्थेमार्फत घडवून आणणे ही प्रमुख कार्य पार पाडले जातात. स्थानिकस्तरावर जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी जिल्हा परिषद, या पदांची निर्मिती केली आहे. त्यांच्यावर जिल्हा परिषदे अंतर्गत राबवावयाच्या शासकीय व जिल्हा परिषदांवरील योजना राबविण्याचे काम सोपविलेले आहे.

जिल्हास्तरावर जिल्हा नियोजन व विकास मंडळ कार्यरत असून लोकप्रतिनिधी समोर पशुसंवर्धन विषयक योजना चर्चिली जातात व त्यानुसार त्या योजनांना तरतूदी प्रस्तावित केले जातात. जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त व जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद हे अधिकारी या सभेत खात्याचे प्रतिनिधीत्व करतात.

पशुसंवर्धन विभागातील कार्यान्वीत असलेल्या संस्थांचा तपशील-संरचना

**पशुवैद्यकीय संस्था**

| अ. क्र. | कार्य उद्दिष्टे | संस्था | संख्या |
|---|---|---|---|
| १ | **पशुवैद्यकीय सेवा व पशुआरोग्य** | १. पशुवैद्यकिय सर्वचिकित्सालये | ३३ |
| | | २. लघुपशुवैद्यकिय सर्वचिकित्सालये | १६९ |
| | | ३. पशुवैद्यकिय दवाखाने श्रेणी - १ (राज्यस्तरीय) | ८५ |
| | | ४. पशुवैद्यकिय दवाखाने श्रेणी - १ (स्थानिकस्तर) | १६५९ |
| | | ५. पशुवैद्यकिय दवाखाने श्रेणी - २ (राज्यस्तरीय) | ५८५ |
| | | ६. पशुवैद्यकिय दवाखाने श्रेणी - २ (स्थानिकस्तर) | २२५६ |
| | | ७. फिरते पशुवैद्यकिय दवाखाने | ६५ |
| | | ८. एकूण पशुवैद्यकिय संस्था | **४८५२** |
| | | ९. तपासणी नाका | १३ |
| २ | **पशुरोग निदान व उपाययोजना** | १. पशुवैद्यकिय जैव पदार्थ निर्मिती संस्था, पुणे | १ |
| | | २. भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी राज्यस्तरीय पशुरोग अन्वेषण प्रयोगशाळा, पुणे (पश्चिम विभागीय संदर्भ प्रयोगशाळा) | १ |

| | | | |
|---|---|---|---|
| | | ३. विभागीय रोग अन्वेषण प्रयोगशाळा | ७ |
| | | ४. गुण नियंत्रण प्रयोगशाळा, गोरेगांव, मुंबई | १ |
| | | ५. सिमावर्ती तपासणी नाके | १३ |
| **३** | **गुरे व म्हशींचा विकास** | महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ, नागपूर | १ |
| | | १. पशुपैदास प्रक्षेत्रे/वळूमाता केंद्रे | १० |
| | | २. महिष पैदास प्रक्षेत्रे /वळूमाता केंद्रे | १ |
| | | ३. वळू संगोपन केंद्रे (क्र. १ ते ३ येथील संस्था महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ नागपूर यांचे अंतर्गत आहेत) | २ |
| | | ४. अतिशीत विर्य प्रयोगशाळा (पुणे,नागपूर, औरंगाबाद येथील संस्था महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ नागपूर यांचे अंतर्गत) | ३ |
| | | ५. एकुण अतिशित विर्य कृत्रिम रेतन केंद्रे | ४८५० |
| **४** | **कुक्कुट विकास** | १. मध्यवर्ती अंडी उबवणी केंद्रे | ४ |
| | | २. सघन कुक्कुट विकास प्रकल्प (जिल्हा परिषदेकडे हस्तांतरीत) | १६ |
| | | ३. बदक पैदास प्रक्षेत्र, (वडसा ) गडचिरोली | १ |
| **५** | **शेळी/ मेंढी विकास** | १. पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ, पुणे-१६ | १ |
| | | २. पशुखाद्य विश्लेषण प्रयोगशाळा (राज्यस्तर) | १ |
| | | ३. शेळी/ मेंढी प्रक्षेत्र | १५ |
| **६** | **विस्तार प्रशिक्षण** | १. राज्यस्तरीय प्रशिक्षण केंद्र, गोखलेनगर | १ |
| | | २. महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ | १ |
| | | ३. महाराष्ट्र राज्य पशुवैद्यक परिषद | १ |

## एकात्मिक सर्वेक्षण योजना

राज्यात पशुसंवर्धन विषयक योजना आणि कार्यक्रमांचे प्रभावी नियोजन करण्यासाठी उपलब्ध साधन सामग्री आणि उत्पादन क्षमते बाबतची आधारभुत आकडेवारी अद्ययावत उपलब्ध असणे अत्यंत गरजेचे आहे. त्याच प्रमाणे पशुसंवर्धन विषयक राबविण्यात आलेल्या योजनांची दृष्य फलनिष्पती जाणून घेण्याच्या दृष्टीने पशुधन उत्पादनाची अद्ययावत आकडेवारी गोळा करणे गरजेचे आहे. याच उददेशाने केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार आणि त्यांच्याकडून उपलब्ध होणा-या अर्थ सहाय्यातून **एकात्मिक सर्व्हेक्षण योजना व पशुगणना** हे कार्यक्रम राबविण्यात येतात. या दोन्ही कार्यक्रमांचा भावी काळातील नियोजना करीता मोठा उपयोग होतो.

**एकात्मिक सर्वेक्षण योजना महाराष्ट्र राज्य, पुणे ♦ दुध, अंडी,लोकर व मांस उत्पादनाची आकडेवारी**

| अ.क्र. | वर्ष | दुध (०००मे.टन) | अंडी कोटी) | लोकर (मे.टन) | मांस (०००मे.टन) |
|---|---|---|---|---|---|
| १ | २०१५-१६ | १०१५३ | ५२९ | १३९० | ६७५ |
| २ | २०१६-१७ | १०४०२ | ५४८ | १४०७ | ८४५ |
| ३ | २०१७-१८ | १११०२ | ५७० | १४३७ | ९२५ |
| ४ | २०१८-१९ | ११६५५ | ५९६ | १४५७ | १०२० |
| ५ | २०१९-२० | १२०२४ | ६३७ | १४१२ | ११४० |
| ६ | २०२०-२१ | १३७०३ | ६४० | १५५० | ११०९ |
| ७ | २०२१-२२ | १४३०५ | ७०२ | १५८५ | ११३८ |

**राज्यस्तरीय नाविन्यपूर्ण योजना :**

१. राज्यात दुध उत्पादनास चालना देण्यासाठी ०२ दुधाळ देशी /०२ दुधाळ संकरीत गायी/०२ म्हशींचे गट वाटप करणे , या नाविन्यपूर्ण राज्यस्तरीय सर्वसाधारण , अनुसुचित जाती उपयोजना व आदिवासी उपयोजने अंतर्गत सुधारित योजनेस दि.२७.०४.२०२३ रोजी प्रशासकीय मंजुरी प्रदान करणेबाबत

| **योजनेचे नाव** | **स्वरूप** |
|---|---|
| राज्यातील ग्रामीण भागात दुध उत्पादनास चालना देण्यासाठी ०२ दुधाळ देशी /०२ दुधाळ संकरीत गायी/०२ म्हशींचे गट वाटप करणे | राज्याच्या दूध उत्पादनामध्ये वाढ करण्याबरोबरच ग्रामीण भागातील शेतकरी व पशुपालकांना अर्थाजनाचे व स्वयंरोजगाराचे साधन उपलब्ध करुन देण्यासाठी लाभार्थीना ०२ दुधाळ देशी /०२ दुधाळ संकरीत गायी /०२ म्हशींचे गट वाटप करण्यात येतात. सर्वसाधारण प्रवर्गातील लाभार्थीना गटाच्या किंमतीच्या ५० टक्के आणि अनुसूचित जाती व जमातींच्या लाभार्थीना गटाच्या किंमतीच्या ७५ टक्के अनुदान देण्यात येते. सर्वसाधारण प्रवर्गातील व अनुसूचित जाती / जमातींच्या लाभार्थीना अनुक्रमे ५० टक्के व २५ टक्के एवढा निधी स्वत: /अथवा बँक/वित्तीय संस्थेकडून कर्ज घेवून उपलब्ध करुन घ्यावयाची आहे. दुधाळ जनावरांची खरेदी जनावरांच्या बाजारातून करण्यात येते.<br>गट किंमत:<br>०२ दुधाळ देशी /०२ दुधाळ संकरीत गायी-रु. १५६८५०/-<br>०२ म्हशींचा गट रु. १७९२५८/- |

- राज्यस्तरीय नाविन्यपूर्ण योजना सन २०१५-१६ पासु न राबविण्यात येत असून उपरोक्त सुधारित निकषानुसार योजना २०२३-२४ पासून राबविण्यात येत आहे.
- सदर योजनेंतर्गत सन २०२३-२४ मध्ये रु.३२५०.०० लक्ष निधी अर्थसंकल्पित करण्यात आलेला आहे
- दि.३१ जानेवारी २०२३ च्या मंत्रिमंडळ बैठकीत, विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय वैयक्तिक लाभाच्या योजने अंतर्गत **दुधाळ जनावरांच्या किंमतीत सुधारणा** (पूर्वी प्रती

देशी /संकरीत गाय /म्हैस दर रु.४०,०००/- नवीन दर प्रती देशी /संकरीत गाय रु. ७०,०००/- व म्हैस रु .८०,०००/-) करण्यात आलेली आहे.

- दि.१२.०९.२०२२ व दि.०४.१०.२०२२ रोजी पार पडलेल्या मंत्रीमंडळ बैठकीत मंत्रीमंडळाने राज्यात उभ्दवलेल्या लम्पी चर्मरोग आजाराने ज्या शेतकरी/पशुपालकांची पशुधन मृत्युमुखी पडलेले आहे अशा शेतकरी/पशुपालक यांना राज्यस्तरीय नाविन्यपूर्ण सर्वसाधारण योजनेंतर्गत राज्याच्या दुध उत्पादनास चालना देण्यासाठी ०६/०४/०२ दुधाळ संकरीत गायी/म्हशींचे गट वाटप करणे या योजनेसाठी सन २०२२-२३ मध्ये अर्थसंकल्पित करण्यात आलेल्या निधी मधुन राष्ट्रीय आपत्ती निवारण धोरणामधील अर्थिक निकषाप्रमाणे अर्थसहाय्य देण्यात आलेले आहे.

**२. राज्यस्तरीय योजनेंतर्गत मंजूर योजना- नाविन्यपुर्ण योजने अंतर्गत अंशत: ठाणबद्ध पद्धतीने शेळी/मेंढी पालनाव्दारे शेतक-यांना पूरक उत्पन्न मिळवून देणे**

| योजनेचे नाव | स्वरूप |
|---|---|
| नाविन्यपुर्ण योजने अंतर्गत अंशत: ठाणबद्ध पद्धतीने शेळी/मेंढी पालनाव्दारे शेतक-यांना पूरक उत्पन्न मिळवून देणे | या योजने अंतर्गत १० शेळ्या/मेंढ्या व १ बोकड /नर मेंढा यांचे गट वाटप करण्यात येते. सर्वसाधारण प्रवर्गातील लाभार्थीना गट किंमतीच्या ५० टक्के आणि अनुसूचित जाती व जमातींच्या लाभार्थीना प्रकल्प किंमतीच्या ७५ टक्के अनुदान देण्यात येते. सर्वसाधारण प्रवर्गातील व अनुसूचित जाती/ जमातींच्या लाभार्थीना अनुक्रमे ५ टक्के एवढा निधी स्वत: उभारणे व उर्वरीत रक्कम अनुक्रमे ४५ टक्के व २० टक्के बँकेकडून कर्जरुपाने/ स्वत: उपलब्ध करुन घ्यावयाची आहे. या योजने अंतर्गत उस्मानाबादी/संगमनेरी या जातीच्या शेळ्या व बोकड तसेच मडग्याळ किवा दख्खनी मेंढ्या अथवा अन्य स्थानिक स्थानीक यांचे गटांचे वाटप करण्यात येते.<br>गट किंमत<br>उस्मानाबादी/संगमनेरी शेळी रु. १०३५४५/-<br>स्थानिक शेळी रु.७८२३१/-<br>मडग्याळ मेंढ्या रु.१२८८५०/-<br>दख्खनी व स्थानिक मेंढ्या रु.१०३५४५/- |

- सदर योजनेंतर्गत सन २०२३-२४ मध्ये सर्वसाधारण रु.३०००.०० लक्ष व विघयो रु.२०००.०० लक्ष निधी अर्थसंकल्पित करण्यात आलेला आहे

३. **राज्यस्तरीय नाविन्यपूर्ण योजनेंतर्गत सर्वसाधारण / अनुसूचित जाती उपयोजना आदिवासी क्षेत्र उपयोजना/ १००० मांसल कुक्कुट पक्षी संगोपनाद्वारे कुक्कुट पालन व्यवसाय सुरु करणे**

| **योजनेचे नाव** | **स्वरूप** |
|---|---|
| राज्यस्तरीय नाविन्यपूर्ण योजनेंतर्गत सर्वसाधारण / अनुसूचित जाती उपयोजना/ आदिवासी क्षेत्र उपयोजना/ १००० मांसल कुक्कुट पक्षी संगोपनाद्वारे कुक्कुट पालन व्यवसाय सुरु करणे | या योजने अंतर्गत पक्षी संगोपनासाठी पक्षीगृह व इतर मुलभूत सुविधा उभारणेकरीता (जसे स्टोर रूम,पाण्याची टाकी,निवासाची सोय,विद्युतीकरण इ.) वि.घ.यो.मधून ७५% खर्चाच्या म्हणजे रु. १,६८,७५०/-मर्यादेपर्यंत शासकीय अनुदान देय राहील. (एकूण प्रकल्पाची किम्मत रु. २,२५,०००/-) सर्वसाधारण प्रवर्गासाठी ५०% मर्यादेपर्यंत शासकीय अनुदान रु. १,१२,५००/ -अनुदेय राहील. |

- सदर योजनेंतर्गत सन २०२३-२४ मध्ये अनुसूचित जाती उपयोजना आदिवासी क्षेत्र उपयोजना करिता रु. १००.०० लक्ष निधी अर्थसंकल्पित करण्यात आलेला आहे.

- सन २०२३-२४ करिता सदरील योजना सर्वसाधारण प्रवर्गासाठी मनरेगा अंतर्गत राबविणे बाबत शासन निर्देश आहेत .

**मराठवाडा पॅकेज -**

१.मराठवाडा पॅकेज अंतर्गत जालना जिल्हयात २ देशी/संकरीत गायी / २ म्हशींचा गट वाटप करणे ही पथदर्शी योजना सन २०१७-१८ मध्ये राबविण्यास (सुधारित २७.०४.२०२३) प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत

| **योजनेचे नाव** | **स्वरूप** |
|---|---|
| मराठवाडा पॅकेज अंतर्गत जालना जिल्हयात ०२ देशी/०२ संकरीत गायी / ०२ म्हशींचा गट वाटप करणे | मराठवाडा पॅकेज अंतर्गत जालना जिल्हयात २ देशी/संकरित गायी/म्हशीं (प्रत्येकी १०००) गट वाटप करणे ही पथदर्शी योजना सन २०१६-१७ मध्ये राबविण्यास दि.१५/१०/२०१६ च्या शासन निर्णयानुसार मान्यता प्रदान केलेली आहे. सुधारित शासन निर्णय २७.०४.२०२३ नुसार योजना व मार्गदर्शक सुचना निर्गमीत करण्यात आलेल्या आहेत. सदरच्या योजना सर्व प्रवर्गासाठी असुन लाभार्थीना ५० टक्के अनुदान (Back Ended) देय आहे. सदरचे अनुदान गट स्थापनेच्या पहील्या वर्षी पहिल्या ६ महिन्यात २५ टक्के व उर्वरित २५ टक्के अनुदान दुसऱ्या ६ महिन्यात थेट बँक खात्यात जमा करावयाचे आहे.<br>अनुदान ५० टक्के<br>दुधाळ गाय गटाची किंमत रु.१,६६,८५०/- (वाहतूक,पशु खरेदी व विमा)<br>दुधाळ म्हैस गटाची किंमत रु.१,८९,२५८/-(वाहतूक,पशु खरेदी व विमा) |

- सदर योजनेंतर्गत सन २०२३-२४ करिता रु. १००.०० लक्ष निधी अर्थसंकल्पित करण्यात आलेला आहे.

२. मराठवाडा पॅकेज अंतर्गत जालना जिल्हयात २० शेळया + २ बोकड असा शेळी गट वाटप करणे ही पथदर्शी योजना सन २०१६-१७ मध्ये राबविण्यासाठी प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत

| योजनेचे नाव | **स्वरूप** |
|---|---|
| मराठवाडा पॅकेज अंतर्गत जालना जिल्हयात २० शेळया + २ बोकड असा शेळी गट वाटप करणे | मराठवाडा पॅकेज अंतर्गत जालना जिल्हयात २० शेळया व २ बोकड गट (१००० गट ) वाटप करणे ही पथदर्शी योजना सन २०१६-१७ मध्ये राबविण्यास दि.१५/१०/२०१६ च्या शासन निर्णयानुसार मान्यता प्रदान केलेली आहे. सदर योजना कार्यान्वीत करण्यासाठी दि.२८/११/२०१६ रोजी मार्गदर्शक सुचना निर्गमीत करण्यात आलेल्या आहेत. सदरच्या योजना सर्व प्रवर्गासाठी असुन लाभार्थीना ५० टक्के अनुदान (Back Ended) देय आहे. सदरचे अनुदान गट स्थापनेच्या पहील्या वर्षी पहिल्या ६ महिन्यात २५ टक्के व उर्वरित २५ टक्के अनुदान दुसऱ्या ६ महिन्यात थेट बँक खात्यात जमा करावयाचे आहे.<br>अनुदान ५० टक्के (शेळी गटाची किंमत रु.२२९४००) |

- सदर योजनेंतर्गत सन २०२३-२४ करिता रु. १००.०० लक्ष निधी अर्थसंकल्पित करण्यात आलेला आहे.

३. मराठवाडा पॅकेजच्या धर्तीवर पहिल्या टप्प्यात उस्मानाबाद , यवतमाळ, गोंदिया व सातारा आणि दुस - या टप्प्यात बीड व भंडारा या जिल्हयांमध्ये २ देशी /संकरीत गायी आणि २ म्हशींचा गट वाटप करणे ही योजना सन २०१७-१८ पासून राबविण्यास प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत

| **योजनेचे नाव** | **स्वरूप** |
|---|---|
| मराठवाडा पॅकेजच्या धर्तीवर पहिल्या टप्प्यात उस्मानाबाद, यवतमाळ, गोंदिया व सातारा आणि दुस-या टप्प्यात बीड व भंडारा या जिल्हयांमध्ये २ देशी/संकरीत गायी आणि २ म्हशींचा गट वाटप करणे | जालना जिल्ह्याच्या धर्तीवर राज्यातील इतर सहा जिल्ह्यांमध्ये २ दुधाळ जनावरे (गायीव म्हशी) यांचे १००० गट वाटप करण्याची योजना सुरु करण्यात आली आहे. यामध्ये पहिल्या टप्प्यात उस्मानाबाद, यवतमाळ, गोंदिया व सातारा हे चार जिल्हे असून दुसऱ्या टप्प्यात बीड व भंडारा या उर्वरित दोन जिल्ह्यात हि योजना राबविण्यात येणार आहे<br>अनुदान ५० टक्के<br>दुधाळ गाय गटाची किंमत रु.१,६६,८५०/- (वाहतूक,पशु खरेदी व विमा)<br>दुधाळ म्हैस गटाची किंमत रु.१,८९,२५८/-(वाहतूक,पशु खरेदी व विमा) |

- सदर योजनेंतर्गत सन २०२३-२४ करिता रु. ६००.०० लक्ष निधी अर्थसंकल्पित करण्यात आलेला आहे.

४. मराठवाडा पॅकेजच्या धर्तीवर पहिल्या टप्प्यात उस्मानाबाद , यवतमाळ, गोंदिया व सातारा आणि दुस - या टप्प्यात बीड व भंडारा या जिल्हयांमध्ये २० शेळया + २ बोकड असा शेळी गट वाटप करणे ही योजना सन सन २०१७-१८ पासून राबविण्यास प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत

| योजनेचे नाव | **स्वरूप** |
|---|---|
| मराठवाडा पॅकेज अंतर्गत जालना जिल्हयात २० शेळया + २ बोकड असा शेळी गट वाटप करणे | मराठवाडा पॅकेज अंतर्गत जालना जिल्हयात २० शेळया व २ बोकड गट (१००० गट ) वाटप करणे ही पथदर्शी योजना सन २०१६-१७ मध्ये राबविण्यास दि.१५/१०/२०१६ च्या शासन निर्णयानुसार मान्यता प्रदान केलेली आहे. सदर योजना कार्यान्वीत करण्यासाठी दि.२८/११/२०१६ रोजी मार्गदर्शक सुचना निर्गमीत करण्यात आलेल्या आहेत. सदरच्या योजना सर्व प्रवर्गासाठी असुन लाभार्थीना ५० टक्के अनुदान (Back Ended) देय आहे. सदरचे अनुदान गट स्थापनेच्या पहील्या वर्षी पहिल्या ६ महिन्यात २५ टक्के व उर्वरित २५ टक्के अनुदान दुसऱ्या ६ महिन्यात थेट बँक खात्यात जमा करावयाचे आहे.<br>अनुदान ५० टक्के (शेळी गटाची किंमत रु.२२९४००) |

- सदर योजनेंतर्गत सन २०२३-२४ करिता रु. ६००.०० लक्ष निधी अर्थसंकल्पित करण्यात आलेला आहे.

**राष्ट्रीय पशुधन अभियानयोजना:**

केद्र शासनाच्या पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय विभागा मार्फत , **राष्ट्रीय पशुधन अभियान,**हि केंद्र पुरस्कृत योजनां राबविण्यात येत आहे. या योज नांचा उद्देश , रोजगार निर्मिती , उद्योजकता विकास , प्रती पशु उत्पादकता वाढविणे , आणि अशा प्रकारे विकास कार्यक्रमांतर्गत , एका छत्रा खाली , मांस, शेळीचे दूध, अंडी आणि लोकर उत्पादन वाढविणे असा आहे.

राष्ट्रीय पशुधन अभियान अंतर्गत उद्योजगता विकास कार्यक्र मामध्ये, १००० कुक्कुट पक्ष्यांचे संगोपन व अंडी उबवणी केंद्राची स्थापना करणे , १०० ते ५०० पर्यंत शेळी मेंढी गटाची स्थापना करणे , ५० ते १०० वराह गटाची स्थापना करणे , चारा मूल्यवर्धनम्हणजेच, मुरघास(सायलेज), Total mixed ration, वैरणीच्या विटा(ब्लॉक) युनिट आणि स्टोरेज युनिट तयार करणे या योजनांचा समावेश आहे. यासाठी केंद्र सरकार प्रकल्प किमतीच्या ५०% भांडवली अनुदान देणार आहे. वेगवेगळ्या योजनांसाठी अनुदानाची कमाल मर्यादा वेगवेगळी मंजूर असुन रुपये २५ लाख ते ५० लाख या मर्यादेत अनुदान देय आहे.भांडवली अनुदान हे दोन समान हप्त्यांमध्ये भारतीय लघु उद्योग विकास बँक ( SIDBI) मार्फत थेट लाभार्थीच्या खात्यात वितरीत केले जाईल.

यायोजनांचाकोणतीहीव्यक्ती, उद्योजक,शेतकरी उत्पादक संस्था (FPO), बचत गट , शेतकरी सहकारी संघटना (FPC), संयुक्त दायित्व गट , कलम ८ अंतर्गत नोंदणी असलेल्या कंपन्या लाभ घेवू शकतात. निवडीसाठी आवश्यक निकष खालीलप्रमाणे.

- ❖ प्रकल्प चालविण्यासाठी आवश्यक प्रशिक्षण घेतले असणे किंवा प्रशिक्षित तज्ञांना नियुक्त करणे
- ❖ शेळी/मेंढी पालन, कुक्कुट पालन, वराह पालन, वैरण विकास बाबत अनुभव असणे
- ❖ बँक कर्ज मंजूरी किंवा स्व-अर्थसहाय्यित प्रकल्पांमध्ये बँक हमी
- ❖ स्वतःची जमीन किंवा भाडे तत्वावर घेतलेली जमीन
- ❖ केवायसी शी संबंधित आवश्यक कागदपत्रे

**अर्जदार www.nlm.udyamimitra.inया संकेतस्थळावर अर्ज करू शकतात**

केंद्र शासनाच्या या योजनांचा राज्यातील जास्तीत जास्त लाभार्थींनी लाभ घेतल्यास राज्यात जास्तीत जास्त उद्योजक निर्माण होतील आणि त्यांच्या उत्पन्नामध्ये भरघोस वाढ होईल. तसेच, या उद्योगाशी संलग्न असलेल्या जास्तीत जास्त पशुपालकांना नवीन स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण होवून राज्याला प्रगतीच्या दिशेने अग्रेसर करण्यास हातभार लागू शकेल.

**पशुसंवर्धनविषयक किसान क्रेडीट कार्ड योजना( केसीसी )**

- ❖ **योजनेचा उद्देश :- पशुसंवर्धनव्यवसायकरणाऱ्याशेतकरी/पशुपालकयांनापशुधनाच्यादेखभालीसाठीखेळतेभांडवल व्याज अनुदानासहक्रेडीटसुविधाउपलब्धकरूनदेणे**
- ❖ दिनांक ०१ मे २०२३ ते ३१ मार्च २०२४ या कालावधीसाठी योजनेस मुदतवाढ देण्यात आली आहे.
- ❖ ज्या शेतकऱ्याकडे शेतीचे किसान क्रेडीट कार्ड असेल , त्यास पतमर्यादा वाढवून ३ लक्षपर्यंतच्या कर्जावर व्याज सवलत.
- ❖ ज्या शेतकऱ्याकडे शेतीचे किसान क्रेडीट कार्ड नसेल , त्यास पशुसंवर्धनविषयक किसान क्रेडीट कार्डवर विनातारण रु.१.६० लक्ष कर्ज उपलब्ध करून देणे.
- ❖ दूध संस्थेने हमी दिल्यास पशुसंवर्धनविषयक किसान क्रेडीट कार्डवर ३ लाखापर्यंतपतपुरवठा.
- ❖ व्याजाचा दर ७ टक्के. तसेच,नियमित कर्जफेड केल्यास अतिरिक्त ३ टक्क्यांपर्यंत व्याज सवलत.बँकांना यावर अतिरिक्त २ टक्के व्याज सवलत
- ❖ राज्यातील **१०,००,०००** लाख पात्र शेतकऱ्यांना समाविष्ट करण्याचे लक्ष पशुसंवर्धन विभागास देण्यात आले आहे.
- ❖ जे शेतकरी पशुपालन , शेळी-मेंढीपालन, वराहपालन, कुक्कुटपालन यांसारख्या विविध पशुसंवर्धन कार्यात सहभागी आहेत व दूध सोसायटी / दूध उत्पादक कंपनी यांचे सभासद आहेत , तसेच ज्यांना पुर्वीच्या मोहिमेत समाविष्ट केले गेले नाही, अशा सर्व पात्र शेतकऱ्यांना या मोहिमेद्वारे पशुसंवर्धनविषयक केसीसी कार्ड योजनेचा लाभ देण्यात येत आहे.
- ❖ योजनेचे सनियंत्रण अधिकारी - जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद

❖ योजनेचे जिल्हा समन्वयक - व्यवस्थापक जिल्हा अग्रणी बँक

## जिल्हा वार्षिक योजना वैरण विकास :

### अ) सर्वसाधारण (General)

१. एकात्मिक कुक्कुट विकास कार्यक्रम
२. कामधेनू दत्तक ग्राम योजना
३. कृत्रिम रेतन केंद्र व उपकेंद्र
४. पशुवैद्यकिय दवाखाने / पशुप्रथमोपचार केंद्र निवासी/ बिगरनिवासी बांधकाम करणे (२४०३)
५. पशुवैद्यकिय दवाखाने/ चिकीत्सालये स्थापना
६. पशुवैद्यकिय दवाखाने/ चिकित्सालये यांचे बांधकाम, बळकटीकरण व आधुनिकीकरण ४४०३ भांडवली खर्च
७. तालुका स्तरावर लघुपशुवैद्यकिय सर्वचिकित्सालयाची स्थापना करणे
८. पशुवैद्यकिय सर्वचिकीत्सालयाचा विस्तार व आधुनिकीकरण
९. पशुवैद्यकिय प्रथमोपचार केंद्राचा व संस्थांचा दर्जावाढ
१०. दुभत्या जनावरांना खाद्य उपलब्धतेसाठी सुधारणा कार्यक्रम
११. संकरित कालवडी आणि सुधारित म्हशींच्या पारड्याची जोपासना करण्यासाठि विशेष पशुधन कार्यक्रम
१२. पशुवैद्यकीय दवाखान्यात/ संस्थांना औषध पुरवठा करणे
१३. पशुसंवर्धनासाठी प्रदर्शन व प्रचार कार्यक्रम

### आ) अनुसूचित जाती घटक कार्यक्रम (SCP)

१. दुभत्या जनावरांचे गट वाटप करणे वि.घ.यो.
२. दुभत्या जनावरांना खाद्य अनुदान
३. शेळ्या मेंढ्या गटाचा पुरवठा
४. पशुसंवर्धन प्रशिक्षण कार्यक्रम
५. अनुसूचित जाती कुटुंबाच्या जनावरांना जंतनाशक पुरविणे

### इ) आदिवासी उपयोजना (TSP)

१. कृत्रिम रेतन केंद्र व उपकेंद्र
२. वैरण विकास कार्यक्रम
३. जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त व जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी कार्यालयाचे बळकटीकरण
४. नाविन्यपुर्ण योजने अंतर्गत आदिवासी लाभार्थ्यांना १०+१ शेळी गट पुरवठा करणे
५. तलंगा गट वाटप
६. तालुका स्तरावर लघुपशुचिकित्सालयाची स्थापना / बांधकाम करणे
७. दुभत्या जनावरांना खाद्य पुरवठा करणे
८. दुभत्या जनावरांचे गट वाटप करणे
९. पशुवंध्यत्व निवारण मेळाव्याचे आयोजन करणे
१०. पशुवैद्यकीय दवाखाना/ प्रथमोपचार केंद्राची स्थापना /दर्जावाढ-

११. पशुवैद्यकीय दवाखाना/ पशु प्रथमोपचार केंद्रासाठी इमारती बांधणे
१२. विविध पशुवैद्यकीय संस्थांना औषध पुरवठा करणे.
१३. शेळ्या मेंढ्यांचे गट पुरवणे
१४. संकरित कालवडी आणि सुधारित म्हशींच्या पारड्याची जोपासना करण्यासाठि विशेष पशुधन कार्यक्रम
१५. नाविन्यपुर्ण योजने अंतर्गत ६/४/२ दुधाळ जनावरांचे वाटप
१६. नाविन्यपुर्ण योजने अंतर्गत १००० मांसल कुक्कुट पक्षी संगोपनाद्वारे कुक्कुट पालन व्यवसाय सुरु करणे

### ई) आदिवासी क्षेत्राबाहेरील आदिवासी उपयोजना(OTSP)

१. वैरण विकास कार्यक्रम
२. नाविन्यपुर्ण योजने अंतर्गत आदिवासी लाभार्थ्यांना १०+१ शेळी गट पुरवठा करणे
३. तलंगा गट वाटप
४. दुभत्या जनावरांना खाद्य पुरवठा करणे
५. दुभत्या जनावरांचे गट वाटप करणे
६. पशुवंध्यत्व निवारण मेळाव्याचे आयोजन करणे
७. पशुवैद्यकीय दवाखाना/ पशु प्रथमोपचार केंद्रासाठी इमारती बांधणे
८. विविध पशुवैद्यकीय संस्थांना जंतनाशके, गोचीड निर्मूलन व इतर औषध पुरवठा करणे.
९. शेळ्या मेंढ्यांचे गट पुरवणे
१०. संकरित कालवडी आणि सुधारित म्हशींच्या पारड्याची जोपासना करण्यासाठि विशेष पशुधन कार्यक्रम
११. नाविन्यपुर्ण योजने अंतर्गत ६/४/२ दुधाळ जनावरांचे वाटप
१२. नाविन्यपुर्ण योजने अंतर्गत १००० मांसल कुक्कुट पक्षी संगोपनाद्वारे कुक्कुट पालन व्यवसाय सुरु करणे
१३. एकात्मिक कुक्कुट विकास कार्यक्रम

## वैरण विकास कार्यक्रम

पशुसंवर्धन विभागामार्फत वैरणीची उपलब्धता वाढवून वैरणीची तुट कमी करण्यासाठी विविध वैरण विकास योजनांची अंमलबजावणी करण्यात येत आहे. यामध्ये प्रामुख्याने खालील उपायांचा समावेश आहे.

१. वैरण पिकाखालील क्षेत्रात वाढ करणे (वैरण व ठोंबांचे १०० टक्के अनुदानावर वितरण)
२. उपलब्ध वैरणीचा योग्य वापर (कडबाकुट्टी यंत्र वापराकरिता प्रोत्साहन))
३. वैरण प्रक्रिया व साठवणूक (मुरघास तयार करण्याकरीता अनुदान)
४. अपारंपारिक वैरणीचा उपयोग(अझोला, हायड्रोपोनिक, युरिया मळी प्रक्रिया )
५. शासन निर्णय क्र . एफडीआर-२०२३/प्र.क्र. ३९/पदुम-४, मुंबई-३२, दिनांक २१ जून २०२३ अन्वये जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत खालील वैरण विकास योजनांचा समावेश करण्यात आलेला आहे.

| योजनेचे नाव | अनुदानाची टक्केवारी | प्रति लाभार्थी एकूण खर्च रूपये | प्रति लाभार्थी अनुदान रक्कम रूपये |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| सायलेज बॅग खरेदीस अनुदान ५०० किलो क्षमतेच्या १० बॅग | ५० टक्के | ६,००० | ३,००० /- |
| मुरघास वापरासाठी अनुदान - दोन दुधाळ पशुधनासाठी (५ किलो प्रति पशुधन प्रतिदिन) | ३३ टक्के | २१,९०० | ७,३०० /- |
| टोटल मिक्स रॅशन (टीएमआर) करिता अनुदान - दोन दुधाळ पशुधनासाठी (१० किलो प्रति पशुधन प्रतिदिन) | ३३ टक्के | १,१६,८०० | ३८,५४४ /- |
| खनिज मिश्रण वापरासाठी अनुदान- दोन दुधाळ पशुधनासाठी (५० ग्रॅम प्रति पशुधन प्रतिदिन) | ३३ टक्के | ३,६०० | १,२००/- |

६. कृत्रिम रेतनाव्दारे गाई मध्ये संकरीकरण तर म्हशींमध्ये सुधारित पैदास करण्याचा कार्यक्रम राबविणे.एकात्मिक पाहणी योजनेअंतर्गत राज्यातील एकूण दुध, अंडी, लोकर व मांस या प्रमुख पशुजन्य पदार्थाच्या उत्पादनाची आर्थीक पशुपालन पध्दतीचा अभ्यास करणे.

**विस्तार व प्रशिक्षण.**

आधुनिक तंत्रज्ञानाचा क्षेत्रिय पातळीवर यशस्वीपणे स्विकार व अवलंब होण्यासाठी विस्तार कार्यक्रम महत्वाचा आहे. या दृष्टीने शेतकऱ्यांच्या प्रशिक्षणाचे कार्यक्रम नियमितपणे आयोजित करण्यात येतात. राज्यामध्ये ठिकठिकाणी प्रतिवर्षी आयोजित होत असलेल्या पशुप्रदर्शन, मेळावे, जत्रा, यात्रा इ. ठिकाणी पशुसंवर्धन विभागाचा स्टॉल मांडण्यात येतो. त्याद्वारे प्रदर्शनाला भेट देणाऱ्या गोपालक, शेतकरी यांना पशुसंवर्धन विषयक विविध योजनांबाबतची माहिती प्रात्याक्षिकाद्वारे चलचित्रणाद्वारे तांत्रिक मार्गदर्शन करण्यात येते. पशुप्रदर्शनामध्ये दुग्धस्पर्धा भरविण्यात येत असून, पशुधनामध्ये अनुवंशिक सुधारणा कार्यक्रम व याची अद्ययावत माहिती शेतकऱ्यांना देण्याकरीता मार्गदर्शन करण्यात येते. पैदासक्षम गायी म्हशींमधील विविध कारणांमुळे येणा-या वंध्यत्वाचे योग्यरित्या निराकरण करण्याच्या दृष्टीने वंध्यत्व निवारण शिबीरांचे आयोजन करण्यात येते. त्यामध्ये औषधोपचार, वंध्यत्व तपासणी निदान व उपचार या बाबींवर कार्य करण्यात येते. याबरोबरच आकाशवाणी, दूरदर्शन, शेतकरी मासिक आणि वृत्तपत्र या प्रसिध्दी माध्यमांचा पशुसंवर्धनाच्या कार्यक्रमांना पूरेशी प्रसिध्दी मिळण्याच्या उददेशाने गरजेनुरुप उपयोग करुन घेण्यात येतो. सन २०१३-१४ या वर्षा पासून पशुसंवर्धन विस्तार आणि प्रसिद्धी प्रचार कार्यक्रम या सर्वसाधारण योजनेंतर्गत ( २४०३०४७५ ) प्राप्त तरतुदीतून राबविण्यात येतात. तसेच

विस्तार कार्यक्रमा अंतर्गत राज्यातील सर्व क्षेत्रीय अधिकारी कर्मचारी यांचेसाठी पशुधन ऐश्वर्य हे नियतकालिक दरवर्षी प्रकाशित करणेत येते.

**महाराष्ट्र पशुधन विकास मंडळाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या :**

१. राज्यात पशुपैदासीच्या सुनिश्चित केलेल्या धोरणानुसार कृत्रिम रेतनाव्दारे संकरीत/सुधारीत पशुपैदासीकरिता कार्यक्रम राबविणे तसेच राज्यातील कृत्रिम रेतनाचे जिल्हानिहाय लक्ष्य ठरविणे व त्यांच्या पूर्ततेसाठी पाठपुरावा व सनियंत्रण करणे.

२. राज्यात उपलब्ध करुन दिल्या जाणाऱ्या कृत्रिम रेतनाच्या सेवा आणि गोठीत रेतमात्रांचा दर्जा उत्तम व विहीत मानकानुसार राहील यावर काटेकोरपणे नियंत्रण ठेवणे.

३. राज्यात क्षेत्रीय पैदास चाचणी कार्यक्रम राबवून सिध्द वळूंची निश्चिती करणे.

४. राज्यामध्ये केंद्र/राज्य पुरस्कृत योजना राबविणे मुख्यत्वे राष्ट्रीय गुरे पैदास प्रकल्प, राष्ट्रीय गोकुळ मिशन, राष्ट्रिय पशुउत्पादकता अभियान, पंढरपुरी म्हैस वंशावळ सुधारणा कार्यक्रम, राष्ट्रिय पशुविमा योजना, राष्ट्रीय कृषि विकास योजना, अनुवांशिक सुधारणा कार्यक्रम.

५. केंद्र पुरस्कृत योजनांची अंमलबजावणी करतांना शासनाच्या कृषि, ग्रामविकास, जलसंधारण, राष्ट्रीय पाणलोट क्षेत्रविकास कार्यक्रम आणि स्वर्णजयंती ग्रामस्वयंरोजगार योजना यांचा योग्य समन्वय ठेवणे.

६. राष्ट्रीय गुरे पैदास प्रकल्प, या योजनेची अंमलबजावणी करतांना दुग्धव्यवसाय विभाग, स्वयंसेवी संस्था, सहकारी दुध संघ, पशुपैदासकाराच्या संघटना आणि महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर यांचेशी समन्वय ठेवून त्यांचा सक्रिय सहभाग मिळविणे.

७. महाराष्ट्र पशुधन विकास मंडळा अंतर्गत क्षेत्रिय स्तरावर कार्यरत असलेल्या संस्थांवर प्रशासकिय, तांत्रिक व वित्तीय नियंत्रण ठेवणे.

८. राज्यातील शेतकरी/पशुपालकांच्या गाई/म्हशींना शासकिय कृत्रिम रेतन केंद्रांमार्फत/ सेवादात्यांमार्फत पारंपारीक व लिंग विनिश्चित विर्यमात्रांचा वापर करुन कृत्रिम रेतनाच्या सुविधा पुरविणे.

मंडळाअंतर्गत क्षेत्रीय स्तरावर कार्यरत संस्था :

महाराष्ट्र पशुधन विकास मंडळाअंतर्गत क्षेत्रिय स्तरावर खालील प्रमाणे संस्था कार्यरत आहेत.

१. गोठीत रेत प्रयोगशाळा : पुणे, औरंगाबाद, नागपूर (एकुण-३)

२. वळू संगोपन केंद्र : औरंगाबाद, नागपूर (एकुण-२)

३. वळू माता प्रक्षेत्र : जत, जुनोनी, ताथवडे, हिंगोली, कोपरगांव, पोहरा, वडसा,बोड, हेटीकुंडी, वाघापूर (एकुण-१०)

**कृत्रिम रेतन कार्य:**

भारत देश दुग्ध उत्पादनात जगातील पहिल्या क्रमांकाचा देश आहे. मात्र जगाच्या तुलनेत जनावरांची दुध उत्पादन क्षमता फारच कमी आहे. देशामध्ये प्रती दिन प्रती व्यक्ती ( Per capita) दुधाची उपलब्धता २५६ ग्रॅम असून ती राष्ट्रीय सरसरीच्या तुलनेत ( ३३७ ग्रॅम) कमी आहे. भारतामध्ये शुध्द देशी गायींच्या ५० जाती व १७ म्हैशींच्या जाती उपलब्ध आहेत. त्यापैकी महाराष्ट्रामध्ये ५ शुध्द देशी गायींच्या (गवळाऊ, डांगी, लालकंधारी, खिल्लार व देवणी) व २ म्हशींच्या (नागपूरी व पंढरपुरी) जाती आहेत. सदरील जनावरांची दुग्ध उत्पादन क्षमता वाढविण्याकरिता सन २०१० मध्ये राज्य पशु पैदास धोरणाची निश्चिती करण्यात आलेली असून त्यामध्ये खालील बाबींचा समावेश करण्यात आलेला आहे.

१. शुध्द देशी जनावरांचे संवर्धन , जतन व पैदास करण्यासाठी त्याच जातीच्या वळूंच्या विर्यमात्रा वापरुन कृत्रिम रेतन करणे.
२. दुग्ध उत्पादनात वाढ होण्याकरिता संकरित जनावरांना त्याच जातीच्या संकरित वळुंच्या विर्यमात्रा वापरुन कृत्रिम रेतन करणे.
३. गावठी जनावरांची दुग्ध उत्पादन क्षमता वाढविण्याकरिता जर्सी किंवा होलस्टीन फ्रिजियन या जातीच्या विर्यमात्रा वापरुन संकरीकरण करणे तसेच शुध्द देशी जातीच्या (साहीवाल , गीर, थारपारकर, रेडसिंधी, देवनी) वळूंच्या विर्यमात्रा वापरुन कृत्रिम रेतन किंवा नैसर्गिक संयोगाव्दारे पैदास करणे.
४. शुध्द देशी म्हशींचे संवर्धन , जतन व पैदास करण्यासाठी त्याच जातीच्या वळूंच्या रेतमात्रांचा वापर करणे किंवा गावठी म्हशींची उत्पादन क्षमता वाढविण्यासाठी मुऱ्हा , जाफ्राबादी, पंढरपुरी व नागपूरी इ. जातींच्या विर्यमात्रांचा वापर करुन सुधारीत पैदास करणे.

सन २०१७ च्या २० व्या पशुगणनेनुसार राज्यामध्ये एकुण १,९५,९५,९९६ जनावरे असून त्यापैकी ८९,०४,१८४ गायी/म्हशी पैदासक्षम आहेत. जास्तीत जास्त उच्चवंशावळीचे वळू निर्माण/उपलब्ध करुन त्यांचेमार्फत गोठीत रेतमात्रांची निर्मिती करणे आवश्यक आहे तसेच पशुव्यवस्थापनामध्ये सुधारणा करणे गरजेचे आहे. त्याकरिता राज्यामध्ये महाराष्ट्र पशुधन विकास मंडळाच्या अखत्यारितीत ७ वळू माता प्रक्षेत्रांवरुन उच्च वंशावळीच्या वळुंची निर्मिती करण्याचे कार्य व २ वळू संगोपन केंद्रावरुन जोपासण्याचे कार्य मंडळामार्फत अविरत चालु आहे.

मंडळामार्फत **“सर्वसमावेशक अनुवंशिक सुधारणा कार्यक्रम”** या राज्य पुरस्कृत योजनेची अंमलबजावणी पशुसंवर्धन खात्याच्या संस्थांमार्फत चालु असून त्याव्दारे उच्च वंशावळीच्या वळूंची निर्मीती करण्यात येत आहे व सदरील वळू पुढील काळात विर्य उत्पादनासाठी उपलब्ध होतील.

सद्यस्थितीत राज्यातील पैदासक्षम गायी/म्हशींना शासनाच्या पशुसंवर्धन खात्याचे अखत्यारितील ४८४७ कृत्रिम रेतन केंद्रांव्दारे कृत्रिम रेतनाच्या सुविधा पुरविल्या जातात. राज्यातील कृत्रिम रेतन केंद्रांना महाराष्ट्र पशुधन विकास मंडळामार्फत दरवर्षी कृत्रिम रेतनाचे उद्दीष्ट देण्यात येते. सन २०२१-२२ मध्ये कृत्रिम रेतन केंद्रांना ३१,६५,१५१ कृत्रिम रेतनाचे व ६,९६,७२७ संकरित/सुधारित वासरांच्या निर्मितीचे उद्दीष्ट देण्यात आलेले होते. निर्माण होणाऱ्या मादी वासरांची दुध उत्पादन क्षमता निश्चितपणे वाढणार असून त्याव्दारे दुग्ध उत्पादनात निश्चितच भर पडणार आहे.

**मंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजना:**

१. केंद्र पुरस्कृत पशुविमा योजना
२. राष्ट्रीय गोकुळग्राम मिशन (आरजीएम)
३. राष्ट्रीय गोकुळग्राम मिशन (आरजीएम) पंढरपुरी म्हैस वंशावळ सुधारणा कार्यक्रम
४. गवळाऊ वंशावळ सुधारणा कार्यक्रम
५. राज्यातील शेतकऱ्यांकडील गाई-म्हशींमध्ये कृत्रिम रेतन कार्यक्रमासाठी लिंग निदान केलेल्या वीर्यमात्रा (Sex Sorted Semen) वापर करून उच्च वंशावळीच्या कालवडी / पारड्यांची निर्मिती करणे
६. बाह्य फलन व भ्रुण प्रत्यारोपण ( In-Vitro-Fertilization & Embryo Transfer) तंत्रज्ञानाचा पशुपालकांसाठी वापर
७. राष्ट्रीय कृत्रिम रेतन कार्यक्रम

**पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळाची स्थापना उद्दिष्टे व कार्ये**

**उद्‌दिष्टे**

- महाराष्ट्रात विदेशी/स्थानिक/संकरित शेळ्या मेंढयांची पैदास प्रक्षेत्रे स्थापण व त्याचा विस्तार करणे.
- शेळ्या मेंढयांच्या पैदाशी करिता उपयुक्त ठिकाणी अशा केंद्राची वाढ करणे.
- शेळ्या/मेंढया आणि त्यापासून उत्पादित होणाऱ्या वस्तूंची आयात / निर्यात करणे,शेळ्या-मेंढयांची पैदास करणे आणि विक्री करणे.
- स्थानिक शेळ्या मेंढयांची जात सुधारण्यासाठी संकरित पैदास कार्यक्रम हाती घेणे/ अथवा कार्यक्रमांना प्रोत्साहन देण्यासाठी शासनाला मदत करणे.
- शेळ्या मेंढयांच्या गुणवत्तेत सुधारणा घडवून पशुपालकांना प्रती शेळी-मेंढी मिळणाऱ्या उत्पादनात वाढ होऊन शेळी-मेंढी पालन व्यवसाय किफायतशीर होण्यासाठी शासनाच्या मदतीने/मदतीशिवाय विस्तार केंद्रे स्थापणे.
- शेळीमेंढी पालनाला उत्तेजन देण्यासाठी सहकारी संस्था, व्यक्ति अथवा फर्म यांना वित्तीय पुरवठा करणेकरिता मदत करणे.

**महामंडळा मार्फत राबविणेत येणाऱ्या योजना**

- राष्ट्रीय पशुधन अभियान (NLM): पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळा अंतर्गत मेंढी व शेळी विकास प्रक्षेत्राचा विकास व आधुनिकीकरण (६० : ४०)
- राज्य योजना : राजे यशवंतराव होळकर महामेष योजना

## कुक्कुट विकास कार्यक्रम

कुक्कुट पालन व्यवसाय मागील ३ ते ४ दशकापासून राज्यात व्यवसाईक दृष्ट्या आर्थिक उत्पन्न वाढण्यासाठी महत्वाचा ठरत आहे. २० वी पशुगणना २०१९ नुसार राज्यामध्ये कुक्कुट वर्गीय पक्षी संख्या **७४२.९७ लक्ष** आहे. राज्यातील २०२१-२२ मधील एकुण अंदाजित अंडी उत्पादन **७०२.०० कोटी** इतके आहे. सन २०१९-२० वर्षाच्या तुलनेत (६३७ कोटी अंदाजित) ११.०४ टक्यांनी वाढ दिसून येते. राज्यात सध्या दरडोई प्रतिवर्षी ५६ अंडी असे उपलब्धतेचे प्रमाण असून ते वाढविण्याची नितांत गरज आहे.

राज्यात शासनाने ४ मध्यवर्ती अंडी उबवणी केंद्र व एक बदक पैदास केंद्र स्थापन केली आहेत. पुणे, औरंगाबाद, कोल्हापूर, व नागपूर या ठिकाणी ही उबवणी केंद्रे आहेत. वडसा जि.गडचिरोली येथे बदक पैदास केंद्र आहे. चारही केंद्रात -होड आयलॅन्ड रेड, गिरीराज, वनराज, कडकनाथ व ब्लॅक अस्ट्रोलार्प जातीचे पक्षांचे संगोपन, संवर्धन व पैदास केली जाते.

हया अंडी उबवणी केंद्रात कुक्कुट पिल्लांची निर्मिती, कुक्कुट पालकांना तसेच शासनाच्या विविध योजनांतर्गत मागणी नुसार पिल्ले पुरविली जातात. त्याच बरोबर ग्राम स्तरावर उबविण्याच्या अंडयांची विक्री करण्यात येते. कुक्कुट पालक, शेतकरी यांना सुधारीत संकरीत जातीच्या कोंबडयांची/ अंडयांची उपलब्धता व्हावी व त्यामध्ये त्यांच्या आर्थिक विकासामध्ये भर पडावी यासाठी उबवणी केंद्रे कार्यरत असतात. त्यासाठी आवश्यक असणा-या प्रशिक्षणाच्या सुविधा उपलब्ध आहे. केंद्राकडून त्या त्या विभागातील सधन कुक्कुट विकस गट यांना देखील पिल्लांचा पुरवठा होत असतो.

C.A.R.I. (Central Avian Research Institute) यांनी विकसीत केलेल्या गिरीराज, वनराज व कडकनाथ या जातीच्या - कुक्कुट पक्षांची पैदास राज्यातील मध्यवर्ती अंडी उबवणी केंद्रावर प्रायोगीक तत्वावर करण्यात येत असून, याद्वारे निर्मित होणारे कुक्कुट पक्षी क्षेत्रीय स्तरावर इच्छुक कुक्कुट पालक/ परसातील कुक्कुट पालन करु इच्छिणाऱ्यांना पुरविण्यात येत आहेत.

राष्ट्रीय सहकार विकास निगम पुरस्कृत कुक्कुट पालन सहकारी संस्थांना दिलेल्या कर्जाबाबत माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशिल | संख्या |
|---|---|---|
| १. | राज्यातील राष्ट्रीय सहकार विकास निगम पुरस्कृत एकुण सहकारी कुक्कुट पालन संस्था | ७३ |
| २. | प्रक्षेत्रावर पक्षी संगोपन/अंडी उत्पादन इ. चालू असलेल्या संस्था | १८ |
| ३. | अवसायनातील एकूण संस्था | ३० |
| ४. | बंद संस्था | २२ |
| ५. | कर्ज मुक्त झालेल्या संस्था | ०३ |

(रु. लाखात)

| अ. क्र. | संस्था | संस्थेस दिलेले अर्थसहायय | | | | मार्च २०२३ पर्यंत झालेली प्रागतिक वसुली | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कर्ज | भाग भांडवल | अनुदान | एकूण | मुद्दल | व्याज | दंडव्याज | भाग भांडवल | एकूण |
| १ | कर्जमुक्त संस्था -३ | १००.६० | ५७.५५ | १०.०० | १६८.१५ | १००.६० | १३३.३८ | ९.०७ | ५७.५५ | ३००.६० |
| २ | चालू संस्था -१८ | ८९१.०२ | ४४६.५३ | ४६.६७ | १३८४.२२ | ३३७.१५ | ३११.२६ | ०.९३ | १४६.८५ | ७९६.१९ |
| ३ | बंद संस्था -२८ | ९५०.४३ | ७५७.९६ | ९.४० | १७१७.७९ | १६४.९५ | १६४.१६ | ०.०० | ०.०० | ३२९.११ |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | अवसायनात संस्था -३० | १२०५.८६ | ७३९.५१ | ४१.१५ | १९८६.५२ | २१८.२३ | २०१.५५ | ४.६९ | २३.५५ | ४४८.०२ |
| ५ | एकूण -७९ | ३१४७.९१ | २००१.५५ | १०७.२२ | ५२५६.६८ | ८२०.९३ | ८१०.३५ | १४.६९ | २२७.९५ | १८७३.९२ |

राष्ट्रीय सहकार विकास निगम पुरस्कृत चालू व बंद सहकारी कुक्कुट पालन संस्थांच्या थकबाकी वसुली बाबत एकमुस्त करार करणेसाठी शासनाने दि. ०८.०१.२०२१ रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे. सदर शासन निर्णयान्वये एकूण चार संस्थांनी एकमुस्त कराराचा लाभ घेऊन शासन देय रकमेचा भरणा केलेला आहे.

शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे कर्जाच्या वर्षाअखेर थकीत मुद्दल, थकीत व्याजाच्या टप्प्यानुसार खालीलप्रमाणे व्याज आकारणी करून तसेच राज्य शासनाचे दि.३१.०३.२०२० अखेर थकीत भाग भांडवल वसूल करण्यात येवून उर्वरित व्याज व दंडव्याज माफ करण्यास शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात आली आहे.

| संस्था स्थापनेपासून १४ वर्षे अखेर थकीत व्याजाची रक्कम | एकमुस्त करारानाअंतर्गत व्याज माफी रक्कमेची टक्केवारी |
|---|---|
| रु.० ते रु.१५०.०० लक्ष | ५०% |
| रु.१५१.०० लक्ष व त्यापुढे | ४०% |

**परसातील कुक्कूट पालनास प्रोत्साहन देत ही प्रक्रिया रोजगारक्षम करण्याच्या दृष्टीने राज्यातील ३०२ तालुक्यांमध्ये सार्वजनिक खाजगी भागीदारी तत्वांवर सघन कुक्कूट विकास गटाची स्थापना करणे**

- ➢ राज्यातील परसातील कुक्कुटपालनास चालना देण्यासाठी सार्वजनिक-खाजगी भागिदारी तत्त्वावर राज्यातील ३४ जिल्हयांमध्ये एकुण ३०२ तालुक्यात सघन कुक्कूट विकास गटांची (Intensive Poultry Development Blocks ) स्थापना करण्यास शासन निर्णय क्र कुक्कूट-२०१७/ प्र.क्र.६७/ पदुम ४ कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई ३२ दि.१३ नोव्हेंबर २०१७ नुसार प्रशासकीय मंजुरी प्रदान झालेली आहे.
- ➢ या योजनेअंतर्गत एकुण प्रकल्प किंमत रु.१०,२७,५००/- पैकी सर्व प्रवर्गातील लाभार्थींना ५० टक्के अनुदान म्हणजेच रु.५,१३,७५०/- शासनाचे अनुदान देय असून उर्वरीत ५० टक्के रक्कम लाभार्थी स्वत:चा हिस्सा किंवा वित्तीय संस्थेकडूनन कर्ज घेवून उभा करू शकतील. सर्वसाधारण व अनुसूचित जाती उपयोजना व जनजाती क्षेत्र उपयोजनेतील प्रवर्गातील जे लाभार्थी सद्यस्थितीत कुक्कूटपालन व्यवसाय करत आहेत, तसेच ज्या लाभार्थ्याकडे लघु अंडी उबवणूक यंत्र आहे, अशा लाभार्थ्यांना या योजनेअंतर्गत प्राधान्य देण्यात येणार आहे.
- ➢ शासन निर्णयाप्रमाणे सार्वजनिक खाजगी भागिदारी तत्त्वावर सघन कुक्कूट विकास गट सन २०१८-१९ पासून टप्पा-टप्प्याने स्थापना करण्यास मान्यता प्रदान झाली असून सन २०१७-१८

पासून या योजनेत स्थान निश्चिती व लाभार्थ्यांची निवड प्रक्रिया सुरू झाली असून सध्यस्थितीत योजना प्रगतीपथावर आहे.

## महाराष्ट्र प्राणी कल्याण मंडळ

- राज्यात प्राणी कल्याण कायद्यांचे सनियंत्रण करणे आणि प्राण्यांना होणाऱ्या अनावश्यक वेदनांपासून संरक्षण देणे यासाठी दि.२३ मे, १९९१ रोजीच्या शासन निर्णयान्वये मा. मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय प्राणी कल्याण मंडळाची स्थापना करण्यात आली . त्यानंतर दि.१४.८.१९९८, दि.०४.०८.२००४ आणि दि .१३.०९.२०१३ अन्वये यापुर्वी गठित करण्यात आलेल्या प्राणी कल्याण मंडळाची संरचना अधिक्रमीत करुन या मंडळाची पुर्नरचना दि.०४.०७.२०१६ रोजी करण्यात आली आहे व मंडळाचे कार्यालय आयुक्त, पशुसंवर्धन, यांचे कार्यालय, औंध, पुणे-७ येथे स्थापन करण्याचे निर्देशीत करण्यात आले.
- यानुसार, मंडळावर शासनाने नियुक्त केलेले राज्यातील एक संसद सदस्य /विधानमंडळ सदस्य यांची अध्यक्ष व उपाध्यक्ष तसेच प्रधान सचिव (पदुम), आयुक्त (पशुसंवर्धन), आयुक्त (दुग्धव्यवसाय), आयुक्त (मत्स्यव्यवसाय), आयुक्त (कृषि), मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पोलीस महासंचालक, आयुक्त (परिवहन), महाव्यवस्थापक, देवनार पशुवधगृह , अतिरिक्त आयुक्त पशुसंवर्धन यांची पदसिध्द सदस्य म्हणून व शासनाने नामनिर्देशीत केलेले बृहन्मुंबई परिसरातील २ अशासकीय सदस्य व राज्याच्या इतर क्षेत्रातील १० अशासकीय सदस्य अशा एकूण २४ सदस्यांची संरचना करण्यात आली आहे.
- सदर मंडळावर दि . ५ जुलै, २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये मा . श्रीमती पूनम महाजन , लोकसभा सदस्य यांची अध्यक्ष म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे . तसेच दि . ३० जुन, २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये या मंडळाचे उपाध्यक्ष व १२ अशासकीय सदस्यांची शासनाने नियुक्ती केली आहे. सदर मंडळाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व १२ अशासकीय सदस्य यांचा कार्यकाळ त्यांच्या नेमणूकीच्या दिनांकापासुन तीन वर्षांचा आहे आणि पदसिध्द सदस्य त्यांच्या मूळ पदांवर कार्यरत असेपर्यंत मंडळाचे सदस्य राहतील.
- मंडळाचे अध्यक्षांचा कार्यकाळ दि . ४ जुलै, २०१९ रोजी संपूष्टात आलेला आहे तसेच सदर अशासकीय सदस्यांचा व उपाध्यक्षांचा कार्यकाळ दि . २९ जुन, २०२० रोजी संपूष्टात आलेला आहे. मंडळाचे कामकाजाचे दृष्टीने नविन अध्यक्ष , उपाध्यक्ष व अशासकीय सदस्यांची नेमणूक करणे आवश्यक आहे.
- राज्य शासनाने महाराष्ट्र प्राणी कल्याण मंडळावर अशासकीय सदस्यांची नियुक्ती करण्यासाठी इच्छुक असलेल्या सुयोग व्यक्तींची शिफारस करणेबाबत कळविले होते त्या अनुषंगाने महाराष्ट्र

प्राणी कल्याण मंडळावर अशासकीय सदस्य नियुक्तीसाठी एकूण ४५ इच्छुक व्यक्तींचे अर्ज शासनास सादर करण्यात आलेले आहे.

- आजच्या घडीला प्राणी कल्याण विषयक कामे पशुसंवर्धन आयुक्तालयात करण्यात येत आहेत. यामध्ये महाराष्ट्र प्राणी कल्याण मंडळामार्फ़त पाळीव प्राणी दुकान नियम २०१८ आणि श्वान प्रजनन व विपणन नियम, २०१७ अंतर्गत पाळीव प्राणी दुकान व श्वान प्रजनन व विपणन केंद्रांना नोंदणी प्रमाणपत्रे अदा करण्यात येत आहेत.
- राज्यातील सर्व जिल्ह्यामध्ये कार्यरत असलेल्या पेट शॉप व डॉग़ ब्रिडींग सेंटरची तपासणी करुन नोंदणी प्रमाणपत्रे वितरीत करणे, त्यांचे बँक खाते सांभाळणे, नोंदवह्या अद्ययावत ठेवणे व या अनुषंगाने उपस्थित होणा-या तक्रारींचे निवारण करणे ईत्यादी अतिरिक्त स्वरुपाची कामांमध्ये भरपूर वाढ झालेली आहे. याशिवाय, सर्कशीमधील अडकून पडलेल्या प्राण्यांवर होणा-या क्रुरतेस प्रतिबंध करणेबाबत तपासणी तसेच सर्कशीमध्ये किंवा चित्रपटामध्ये/ टिव्ही मध्ये प्रदर्शित करण्यात येणा-या प्राण्यांची Performing Animals (Registration) Rules, २००१ नुसार नोंदणी करणे अशी कामकाजा मध्ये वाढ झालेली आहे.

## जिल्हा प्राणी क्लेश प्रतिबंधक सोसायटी

महाराष्ट्र राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये प्राणी क्लेश प्रतिबंधक कायदा १९६० ची अंमलबजावणी करण्यासाठी प्राणी क्लेश प्रतिबंधक सोसायटी स्थापना व नियमन, नियम २००१ मधील नियम ३ च्या उपनियम (१) च्या द्वारे प्रदान अधिकाराचा वापर करून दिनांक १४ मार्च २०१७ च्या शासन अधिसूचनेद्वारे राज्यातील प्रत्येक जिल्ह्यामध्ये प्राणी क्लेश प्रतिबंधक सोसायटी स्थापन करण्यात आले. सर्व जिल्ह्यातील जिल्हा प्राणी क्लेश प्रतिबंधक सोसायटीचे अशासकीय सदस्यांची नेमणूक करण्यात आलेली असून त्यांचे कामकाज सुरु झाले आहे.

जिल्ह्यात स्थापीत केलेल्या जिल्हा प्राणी क्लेष प्रतिबंधक सोसायटी (SPCA) ची नोंदणी, संस्था नोंदणी अधिनियम, १८६० अंतर्गत जिल्ह्यातील सहाय्यक संस्था निबंधक व सहाय्यक धर्मदाय आयुक्त यांचेकडे करण्याबाबत कार्यवाही सूरू आहे.

## गोसेवा आयोग

राज्यात महाराष्ट्र गोसेवा आयोग अधिनियम २०२३ मंजुर झालेला असुन त्यानुसार गोसेवा आयोग गठित झालेला आहे. दि. ७.७.२०२३ रोजीच्या अधिसूचनेद्वारे अशासकीय सदस्यांची व अध्यक्षांची नेमणूक आयोगावर करण्यात आलेली आहे.

**गोसेवा आयोगाची रचना** :-

१. आयोगावर १४ पदसिध्द सदस्य व ७ अशासकीय सदस्य.
२. आयोगासाठी सहआयुक्त पशुसंवर्धन दर्जाचा अधिकारी सदस्य सचिव.
३. यामध्ये आयुक्त पशुसंवर्धन पदसिध्द सदस्य.

**गोसेवा आयोगाची सर्वसाधारण उदिष्टे:-**

१. महाराष्ट्र राज्यामध्ये पशुंचे संवर्धन संरक्षण व कल्याण करण्यासाठी आणि त्यासाठी कार्यरत असणा-या संस्थांचे पर्यवेक्षण करणे.

२. पशु प्रजननाचे आणि स्थानिक जातीचे संवर्धन अनुवंशिक सुधारणा , वैरण विकास यामध्ये कार्यरत असलेल्या गोसदन, गोशाळा पांजरपोळ, गोरक्षण संस्था इत्यादी संस्थांना उत्तेजन देणे.

३. पशु आरोग्य सेवांचे प्रचलन, देशी पशुंचे सर्वधन व विकास गोवंश प्रजनन धोरणाची अमलबजावणी , वैरण विकास अनुषंगाने कार्य

४. प्राणी क्लेष प्रतिबंध सोसायटी कामकाजाचा आढावा घेणे.

आयोगाच्या मुख्यालयासाठी मुंबई येथे असणार आहे.

- आयोगासाठीच्या पदनिर्मितीचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आलेला आहे.
- गोसेवा आयोग अधिनियमा अंतर्गत २६ (१) कलमानुसार नियम करण्याचा अधिकार शासनास असल्याने त्याअनुषंगानेही प्रारूप नियम शासनास सादर करण्यात आलेले आहे.

प्रारूप नियमांच्या अनुषंगाने नियम तयार पडताळणी करण्यासाठी समिती गठीत करण्यात आलेली आहे . गोसेवा आयोगासाठी स्वतंत्र लेखाशीर्ष निमिर्ती करण्यात आलेले आहे.

परिशिष्ट-७

## महाराष्ट्र प्राणी रक्षण (सुधारणा) अधिनियम १९९५ (दि. ४ मार्च २०१५)

महाराष्ट्र राज्यामध्ये महाराष्ट्र प्राणी रक्षण कायदा, १९७६ हा दिनांक १८ एप्रिल १९७८ पासून अस्तित्वात होता. या कायद्यान्वये गायींची कत्तल करण्यास मनाई होती. या मूळ कायद्यामध्ये सुधारणा करून महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र प्राणी रक्षण (सुधारणा) अधिनियम, १९९५ संपूर्ण राज्यभरात दिनांक ४ मार्च २०१५ पासून लागू केला आहे.

अपेडा अथवा केंद्र व राज्य शासनाच्या तत्सम प्राधिकरणाद्वारे प्राधिकृत असलेल्या राज्यातील कत्तलखान्यामध्ये, महाराष्ट्र प्राणी रक्षण कायदा (सुधारणा) १९९५ अंतर्गत अनुसूचित पशूंच्या कत्तल पुर्व तपासणी करून कत्तलीस योग्य असले बाबतचे प्रमाणपत्र देण्याकरिता भारतीय पशुचिकीत्सा अधिनियम १९८४ मधील तरतुदी नुसार नोंदणीकृत असलेल्या खाजगी पशुवैद्यकांची निवड करणे :

मांस निर्याती करिता अपेडा अथवा केंद्र राज्य शासनाच्या प्राधिकरणाद्वारे प्राधिकृत असलेल्या राज्यातील अधिकृत कत्तलखान्यामध्ये,महाराष्ट्र प्राणी रक्षण कायदा (सुधारणा) १९९५ अंतर्गत अनुसूचित पशूंच्या कत्तल पुर्व तपासणी करून कत्तलीस योग्य असले बाबतचे प्रमाणपत्र देण्याकरिता भारतीय पशुचिकीत्सा अधिनियम १९८४ मधील तरतुदी नुसार नोंदणीकृत असलेल्या खाजगी पशुवैद्यकांची निवड करणे व संबधित कत्तलखान्याकरिता सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित करण्यासाठी त्यांची शिफारस करणेसाठी कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मस्यव्यवसाय विभाग यांचे कडील शासन निर्णय क्रमांक पविआ-१०२० /प.क्र. १४ /पदुम ३, दिनांक १४/०७/२०२०. नुसार कुलगुरू , महाराष्ट्र पशु व मस्त्य विज्ञान विद्यापीठ नागपूर यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात तीन सदस्यीय समिती गठीत करण्यात आली होती. या समितीमध्ये शासन निर्णय क्रमांक पविआ-१०२० /प.क्र. १४ /पदुम ३, दिनांक २९/०६/२०२२ नुसार सुधारणा करण्यात आलेली असून सद्यस्थितीत प्रधान सचिव ( पदुम ) यांचे अध्यक्षतेखाली सदरची समिती कार्यरत आहे. या समितीद्रवारे राज्यातील मान्यता प्राप्त कत्तलखान्यांना त्यांच्या अपेडा मान्य क्षमतेनुसार ११ महिन्यांच्या कालावधीसाठी नोंदणीकृत खाजगी पशुवैद्यक सक्षम प्राधिकारी म्हणून उपलब्ध करुन दिले जातात. यामुळे संबधीत कत्तलखाने त्यांची पूर्ण क्षमता वापरू शकतील त्यामुळे मांसं निर्यातीस चालना मिळण्यास मदत होईल.

## भारतीय पशुवैद्यक परिषद कायदा, १९८४

## (Indian Veterinary Council Act, 1984)

- भारतीय पशुवैद्यक परिषद अधिनियम , १९८४ राज्याच्या विधिमंडळाने मंजूर केल्यानुसार केंद्र शासनाने दि. २३ जुलै, १९९७ या अधिसूचनेद्वारे सदरचा कायदा महाराष्ट्र राज्यात दि. १ ऑगस्ट , १९९७ पासून लागू केलेला आहे. दि. २६ ऑगस्ट , १९९७ च्याअधिसूचनेद्वारे भारतीय पशुवैद्यक परिषद अधिनियम,१९८४ मधील कलम ३० (ख) अन्वये पदवीका / प्रमाणपत्र धारकानी द्यावयाच्या किरकोळ पशुवैद्यकिय सेवा विनिर्दिष्टीत करण्यात आलेल्या आहेत.
- दि. १४ ऑक्टोबर , १९९७ च्या परिपत्रकानुसार सदरच्या पशुवैद्यकिय किरकोळ सेवा नोंदणीकृत पशुवैद्यकाच्या देखरेखीखाली आणि मार्गदर्शनाखाली करण्याच्या सूचना निर्गमित करण्यात

आलेल्या आहेत. भारतीय पशुवैद्यकिय कायद्याच्या कलम खंड ३० (ब) च्या परंतुकामधील पदवीका किंवा प्रमाणपत्र धारकांनी नोंदणीकृत पदवीधर पशुवैद्यक व्यावसायीकाच्यादेखरेखीखाली आणि निर्देशाखाली या सेवा करावयाच्या जी तरतूद आहे त्याबद्दल असे स्पष्टीकरण देण्यात आले आहे की, त्यांनी करावयाच्या विनिदिष्टत सेवा या व्यावसायिकाच्या प्रत्यक्ष उपस्थितच करावयाच्या असे नाही , असे स्पष्ट नमुद केलेले आहे.

परिशिष्ट-८

## पशुवैद्यकीय सेवा व पशुआरोग्य

### पशुस्वास्थ्य व रोग नियंत्रण कार्यक्रम

### (Livestock Health & Disease Control Programme)

सन २०२१-२२ पासुन देशभरात केंद्र पुरस्कृत पशुस्वास्थ्य व रोग नियंत्रण कार्यक्रम राबविण्याच्या केंद्र शासनाच्या सुचना आहेत. सदर कार्यक्रम अंतर्गत राष्ट्रीय पशुरोग नियंत्रण कार्यक्रम व पशुस्वास्थ्य व रोग नियंत्रण समुहगट योजना असे दोन प्रमुख घटक अन्वये राबविण्यात येणार आहे.

**राष्ट्रीय पशुरोग नियंत्रण कार्यक्रम अंतर्गत(एन.ए.डी.सी.पी.) लाळ-खुरकुत रोगनियंत्रण**

"राष्ट्रीय पशुरोग नियंत्रण कार्यक्रम " (National Animal Disease Control Programme: NADCP) ही देशव्यापी महत्वाकांक्षी योजना संपूर्ण देशात मिशन तत्वावर राबविण्या साठी दिनांक ११ सप्टेंबर २०१९ रोजी मथुरा येथे मा. पंतप्रधान महोदय यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले आहे.

सन २०२ २-२३ या वर्षात केंद्र पुरस्कृत योजना पशुस्वास्थ्य व रोगनियंत्रण कार्यक्रमा अंतर्गत एन.ए.डी.सी.पी. या योजनेमधून लाळ-खुरकुत रोगनियंत्रण प्रतिबंधक लसीकरण फ़ेरी तिसरी (३/२०२२) दि. १५/०९/२०२२ पासून सुरु करण्यात आलेली असून सदर फेरीदरम्यान राज्यामध्ये १६९.३३ लक्ष इतक्या लसमात्रांचा पुरवठा करण्यात आलेल्या असून सदर मोहिमेत एकूण १६२.७९ लक्ष ( ९६.१३ टक्के ) जनावरांना (गाय व म्हैस वर्गीय ) लसीकरण करण्यात आलेले आहे . लाळ खुरकुत प्रतिबंधक लसीकरण केलेल्या १५८.१५ लक्ष इतक्या जनावरांची नोंद टॅगींग करुन इनाफ प्रणालीवर करण्यात आलेली आहे.

**राष्ट्रीय पशुरोग नियंत्रण कार्यक्रम अंतर्गत(एन.ए.डी.सी.पी.) ब्रुसेल्ला रोगाचे नियंत्रण**

राज्यात सन २०१९ च्या पशुगणनेनुसार १ वर्षाखालील वय असलेल्या गोवर्गीय कालवडी आणि म्हैसवर्गीय पारड्यांची संख्या २९.०७ लक्ष इतकी आहे. ब्रुसेल्ला रोगनियंत्रण कार्यक्रमाखाली ४ ते ८ महिने वयाच्या पारडी व कालवडींना ब्रुसेल्ला प्रतिबंधक लसमात्रा केंद्र शासनाकडून सन २०२२-२३ मध्ये २९,०६ लक्ष लसमात्रांचा पुरवठा करणेत आलेला आहे. १ जुलै, २०२२ पासून ब्रुसेल्ला प्रतिबंधक लसीकरण मोहिम वर्षभर राज्यात राबविण्यास सुरुवात झा लेली असून आजमितीस १०.६८ लक्ष पशुधनास लसीकरण करण्यात आलेले आहे. ब्रुसेल्ला प्रतिबंधक लसीकरण केलेल्या ४.२८ लक्ष इतक्या जनावरांची नोंद टॅगींग करुन इनाफ प्रणाली वर करण्यात आलेली आहे. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

केंद्र शासनाने परिपत्रीत केलेल्या मॉडेल ॲक्शन प्लॅन नुसार लसीच्या पुरव ठ्याबरोबरच केंद्र शासनाकडून सिरींजेस , निडल्स, गॉगल्स, गमबुट, पर्सनल प्रोटेक्शन किट इ . च्या खरेदीसाठी तसेच प्रसिध्दी आणि प्रचार कार्यक्रम राबविणेसाठी आणि व्हॅक्सीनेटर्सच्या सेवा मोबदला तत्वावर उपलब्ध करुन घेण्यासाठी केंद्र शासनाकडून निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

<u>पशुस्वास्थ्य व रोग नियंत्रण समुहगट योजना</u>

पशुस्वास्थ्य व रोग नियंत्रण समुहगट योजने अंतर्गत
(अ) गंभीर पशुरोग नियंत्रण कार्यक्रम,
(आ) फ़िरती पशुचिकित्सा पथकांची स्थापना व बळकटीकरण व
(इ) ॲस्कॅड (Assistance to States for Control of Animal Diseases, ASCAD)
या तीन योजना राबविण्यात येणार आहेत.

(अ) गंभीर पशुरोग नियंत्रण कार्यक्रम अंतर्गत पीपीआर निर्मूलन (PPR-EP) व क्लासिकल स्वाईन फ़िव्हर कंट्रोल प्रोग्रॅम (CSF-CP) या उपयोजना राबविण्यात येणार आहेत . सदर योजनांची अंमलबजावणी १०० टक्के केंद्र पुरस्कृत तत्त्वावर करण्याच्या केंद्र शास नाच्या सुचना आहेत . त्यानुसार राज्यामध्ये एकूण १४१०० लसमात्रांचा पुरवठा करण्यात आलेला असून लसीकरण मोहीम सुरु आहे.

(आ) फ़िरती पशुचिकित्सा पथकांची स्थापना व बळकटीकरण अंतर्गत प्रती १ लक्ष पशुधनामागे एक फ़िरते पथकाची स्थापना करण्याच्या केंद्र शासनाच्या सुचना आहेत . त्यानुसार चार चाकी वाहने खरेदी करणेकरीता १०० टक्के केंद्र हिस्सा निधी उपलब्ध झालेला असून प्रथम टप्प्यात ८० वाहने खरेदी प्रक्रिया पूर्ण झालेली असून क्षेत्रिय स्तरावर प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

(इ) ॲस्कॅड (Assistance to States for Control of Animal Diseases, ASCAD) ही केंद्र सहाय्यित योजना महाराष्ट्र राज्यात सन २००४-०५ पासून राबविण्यात येत असून सन २०२३-२४ मध्ये केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार ॲस्कॅड पशुस्वास्थ्य व रोग नियंत्रण कार्यक्रम या समुह गट योजनेत अंतर्भूत करण्यात आली आहे . ॲस्कॅड अंतर्गत खालीलप्रमाणे नमुद उपयोजनांसमोर दर्शविलेल्या केंद्र हिस्सा व राज्य हिस्सा नुसार सदर उपयोजनांची अंमलबजावणी करण्यात येते.
१) आर्थिकदृष्टया महत्वाच्या रोगाचे लसीकरण (६० : ४०)
२) प्रशिक्षण व कार्यशाळा आयोजित करणे (१०० : ००)
३) सर्वेक्षण, सनियंत्रण व पुर्व अंदाज बांधणे (६० : ४०)
४) माहिती व जनसंपर्क मेळावे आयोजित करणे (१००:००)
५) विभागीय रोग अन्वेषण प्रयोगशाळा यांचे बळकटीकरण (६० : ४०)
६) अचानक उदभवणारे तसेच विदेशी आजारांचा प्रतिबंध करणे (६० : ४०, ५०:५०)

या योजनेतील आर्थिकदृष्टया महत्वाच्या रो गाचे लसीकरण (६०: ४०) अंतर्गत मोठया जनावरांतील घटसर्प व फ-या, थायलेरीयासिस, लम्पी चर्म रोग, रेबीज इ. तसेच शेळया मेंढयांमधील आंत्रविषार , शीप पॉक्स आणि कुक्कुट पक्षातील राणीखेत , देवी, इ. या आर्थिकदृष्ट्या महत्वाच्या रोगांवर नियंत्रण ठेवण्यासाठी राज्यातील सर्व जिल्हयांत या विविध रोगांचे प्रतिबंधक लसीकरण केले जाते . सदर प्रतिबंधात्मक लसीकरण जनावरांतील रोगप्रादुर्भावांमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर होणारे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी अत्यंत आवश्यक आहे.

**गुणनियंत्रण प्रयोग शाळा, आरे, गोरेगांव, मुंबई-** ६५

या प्रयोगशाळेसाठी

- o Antibiotic Residues : Sulphadinethoxine
- o Pesticide Residues : Lindane
- o Heavy Metals : Copper

- ➢ NABL Accreditation : मानांकन प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे.
- ➢ सध्या उर्वरीत Heavy Metals/Pestcide Residues/Antibiotic Residues चे Method Development चे काम सुरु आहे . गुणनियंत्रण प्रयोगशा ळेला जानेवारी २०१९ मध्ये NABL ACCREDITATION प्राप्त झाल्याने APEDA संस्थेकडे रेजिस्ट्रेशन करण्यात येऊन आता **APEDA APPROVED** प्रयोगशाळांचे यादीत **१२८** व्या क्रमांकावर गुणनियंत्रण प्रयोगशा ळेचे नाव समाविष्ट करण्यात आलेले आहे . सद्यस्थितीत **रासायनिक पृथ्थकरण** चाचण्यांचे शासनाकडून दर निश्चित करण्यात आलेले आहेत. रासायनिक पृथ्थकरण चाचणी निर्यातदारांच्या मागणी नुसार व्यावसायिक तत्वावर करण्यात येत असून निर्यातीसाठी आवश्यक दाखले देण्यात येत आहेत.

## भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी राज्यस्तरीयपशुरोग अन्वेषण प्रयोगशाळा"

### पश्चिम विभागीय संदर्भिय पशुरोग निदान प्रयोगशाळा

**पशुरोग अन्वेषण विभागाची उद्दिष्टे –**

- रोग प्रादुर्भावातील आजारी, मृत गुरांच्या उती नमुन्यांचे संकलन करणे.
- उती नमुन्यांचे अन्वेषण करुन आजारी, मृत गुरांच्या रोगाचे पक्के निदान करणे.
- पशुधनातील व कुक्कुट पक्ष्यातील रोग प्रादुर्भावांची निश्चिती करणे.
- क्षेत्रिय अधिका-यांना रोग प्रादुर्भाव आटोक्यात आणण्यासाठी औषधोपचार, नियंत्रण व निवारणात्मक उपाययोजनांचे मार्गदर्शन करणे.
- पशुधनातील व कुक्कुट पक्ष्यातील विषबाधा निदानासाठी चाचण्या करुन मर्तुक आटोक्यात आणण्यासाठी औषधोपचार, नियंत्रण व निवारणात्मक उपाययोजना सुचविणे.
- राज्यातील ज्ञात व अज्ञात रोगांचे अन्वेषण करणे.
- पशुधनातील क्षय, जोन्स, लैंगिक सांसर्गिक रोग व गर्भपात तसेच कुक्कुट पक्ष्यातील साल्मोनेल्लोसीस या मोठया प्रमाणात आर्थिक नुकसान करणा-या महत्त्वाच्या रोगांच्या नियंत्रणासाठी चाचण्या करणे.
- राज्य व राज्याबाहेरील पशुरोगनिदान प्रयोगशाळामधील अधिका-यांसाठी रोगनिदानासंबंधी प्रशिक्षण वर्गांचे आयोजन करणे.
- निर्यातक्षम पशुधन, कुक्कुट व मांसजन्य पदार्थ यांचे संदर्भात प्रमाणपत्र देणे.
- राज्यातील आयबीआर, पीपीआर, लैंगिक संसर्गिक रोग व गर्भपात व इतर रोगांचे सर्वेक्षण करणे.

- रोग प्रादुर्भावासंबंधीचे अन्वेषण आणि झालेल्या आर्थिक नुकसानीसंदर्भातील सर्वेक्षणाची माहिती घेणे.

**पश्चिम विभागीय संदर्भिय पशुरोग निदान प्रयोगशाळा उद्दिष्टे:**

- रोग प्रादुर्भावामधुन नमुन्यांचे सर्वेक्षण करणे.
- देशाच्या पश्चिम विभागातील राज्यांसाठी जिवाणू, विषाणू, परोपजिवी व इतर आर्थिक नुकसान करणाऱ्या महत्त्वाच्या रोगांसाठी संदर्भीय प्रयोगशाळा म्हणुन कार्य करणे.
- पश्चिम विभागीय राज्यांमधील रोगांबाबत माहिती गोळा करुन भारत सरकार, पशुसंवर्धन विभागास पुरविणे.
- वर्गीकरण केलेले जिवाणू, विषाणू व परोपजिवी जंतुंची जपणुक करणे व आवश्यकतेप्रमाणे राष्ट्रीय जिवाणू /विषाणू/जंतू जपणुक प्रयोगशाळेस पाठविणे.
- रोग निदानासाठी मान्यताप्राप्त असणा-या चाचण्या प्रमाणित करणे व त्याचबरोबर रोगनिदान करणे तसेच इतर राज्यांतील प्रयोगशाळांना माहिती देणे.
- इतर राज्यातील प्रयोगशाळेतील अधिका-यांना रोगनिदानासंबंधी प्रशिक्षण देणे.
- पशुधनातील क्षय, जोन्स व सांसर्गिक गर्भपात आयबीआर व कुक्कुट पक्षातील साल्मोनेल्लासीस या मोठया प्रमाणात आर्थिक नुकसान करणा-या महत्वाच्या रोगांच्या नियंत्रणासाठी चाचण्या करणे.
- भारत सरकार, कृषी खाते, पशुसंवर्धन विभाग, यांनी ठरवुन दिलेल्या उदा. बीएसई/स्क्रेपी इत्यादि रोगांचे सर्वेक्षण करणे.

## पशुवैद्यकीय जैवपदार्थ निर्मिती संस्था, पुणे-६७.

सध्या या संस्थेने जिवाणू उत्पादनासाठी फरमेंटर तंत्रज्ञान अवलंबिले असून आदर्श उत्पादन पध्दतीच्या मानकानुसार लस उत्पादनाची कार्यवाही सन २०१४ पासून नियमितपणे सुरु केली आहे. या फरमेंटर तंत्रज्ञान पध्दतीने एका वेळी फक्त एक (Campaign based) जिवाणू लस उत्पादनाचे कार्य असे वर्षातून घटसर्प, फ-या, आंत्रविषार या लसीचे उत्पादन सोबत सालमोनेला कलर ॲन्टीजन या अभिकारकाचे उत्पादन सुरुळीतपणे सुरु आहे. उत्पादित लस मात्रांचा क्षेत्रीयस्तरावर आवश्यकतेनुसार पुरवठा केला जातो.

संस्थेच्या जिवाणू लस उत्पादनाच्या कार्यामध्ये पूर्वी एका लस गटामध्ये ५०,००० मात्रा तयार होत होत्या. परंतू फरमेंटर तंत्रज्ञानाचा अवलंब केल्यामुळे एका लस गटामध्ये ७,५०,००० एवढ्या मात्रा तयार होत आहेत. तसेच या तंत्रज्ञानामुळे लसीचा जनावरांमधील डोस हा पूर्वीच्या ५ मि.ली. वरुन २ मि.ली असा झालेला आहे. सध्या या प्रकल्पाची जिवाणू लसींच्या उत्पादनाची क्षमता ही सरासरी १.०० कोटी मात्रा एवढी आहे.

### लंम्पी चर्म रोग प्रतिबंधात्मक लसींचे तंत्रज्ञान राज्याच्या पशुसंवर्धन विभागाकडे हस्तांतरित :

सद्य स्थितीत राष्ट्रीय अश्व अनुसंधान केंद्र ( National Research Center on Equines) हिस्सार आणि आय.सी.ए.आर. ,इज्जतनगर,बरेली यांनी लंम्पी चर्म रोग प्रतिबंधात्मक लसींचे तंत्रज्ञान विकसित केले आहे. तसेच भारतीय पशूचिकित्सा अनुसंधान संस्थान (IVRI), इज्जतनगर, बरेली यांनी गोट पॉक्स प्रतिबंधात्मक लसीचे तंत्रज्ञान विकसित केले आहे. सदर दोन्ही तंत्रज्ञान भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांच्या Agrinnovate India या कंपनी मार्फत व्यावसायिक तत्वावर (TOT-Transfer of Technology) राज्याच्या पशुसंवर्धन विभागाकडे हस्तांतरित करण्यात आले आहे.

पशुवैद्यकीय जैव पदार्थ निर्मिती संस्था , औंध, पुणे या ठिकाणी नवनिर्मित विषाणू प्रयोगशाळेमध्ये आदर्श उत्पादन पध्दसतीचा अवलंब करूनLumpy Skin Disease व गोट पॉक्स या विषाणू लसीचे उत्पादन करणेची प्रक्रीयेस सुरुवात झाली आहे.

शासनाकडुन तांत्रीक, प्रशासकीय तसेच वित्तीय मंजुरी प्राप्त झाली असुन लंम्पी चर्म रोग व गोट पॉक्स या रोगावरील लसीकरण तंत्रज्ञान हस्तांतरित करणेत आले आहे.

माहे नोव्हेबर २०२३ पासुन प्रत्यक्ष Lumpy Skin Disease व गोट पॉक्स या विषाणू लसनिर्मीती होणार असुन राज्याच्या पशुधनासाठी आवश्यक लस मात्रा उत्पादीत करणेची क्षमता आहे. तसेच अतिरीक्त लसमात्रा इतर राज्यानां देखील भविष्यात पुरवठा करणेत येईल.

**माहितीचे आदान प्रदान अंतर्गत पशुसंवर्धन विभागाने घेतलेले उपक्रम:**

**पशुसंवर्धन विभाग माहिती व तंत्रज्ञान**

पशुसंवर्धन विभागाकरीता शासन निर्णय दि. ३० सप्टेंबर २००९ नुसार स्वतंत्र संगणक कक्ष स्थापन करण्यात आलेला आहे.

या कक्षाकडून पशुसंवर्धन विभागाचे संकेतस्थळ (ahd.maharashtra.gov.in) आणि महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ (mldb.maharashtra.gov.in) तसेच पशुसंवर्धन विभागाचे पोर्टल (ah.maharashtra.gov.in) यांचे नियमित कामकाज पहिले जाते.

- **पशुसंवर्धन विभागाच्या राज्यस्तरीय नाविन्यपूर्ण योजनेंतर्गत लाभार्थी निवडीसाठी Online प्रक्रिया राबविणे:** पशुसंवर्धन विभागाच्या राज्यस्तरीय नाविन्यपूर्ण योजनेंतर्गत सर्वसाधारण / अनुसूचित जाती उपयोजना/ आदिवासी क्षेत्र उपयोजना या योजनांतर्गत १००० मांसल कुक्कुट पक्षी संगोपनाद्वारे कुक्कुट पालन व्यवसाय सुरु करणे , शेळी पालनाव्दारे शेतक-यांना पूरक उत्पन्न मिळवून देणे तसेच राज्यात दुध उत्पादनास चालना देण्यासाठी दुधाळ संकरीत गायी/म्हशींचे गट वाटप करणे या राज्यस्तरीय व जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत वैयक्तिक लाभाच्या योजनांसाठी लाभार्थी निवड करणेसाठी Online सॉफटवेअर (वेबसाईट आणि ॲन्ड्रॉईड ॲप) विकसित करण्यात आलेले असून सन- २०२१-२२ मध्ये एकूण ८.०० लक्ष अर्ज प्राप्त झाले होते. या कार्याप्रणालीद्वारे सन-२०२२-२३ या वर्षा मध्ये देखील लाभार्थी निवडी करण्यात येते आहे. सदर निवडीनंतर उर्वरित पात्र प्रतीक्षा यादीतील लाभार्त्यांना योजनेचा लाभ देण्यासाठी पाच वर्षासाठी त्यांचा विचार केला जाणार आहे.

संगणकीकरण.

**६. ई-ऑफिस, single platform धोरणाची अंमलबजावणी, Digital Dashboard**

**ई-ऑफिस व ई-सेवा:**

- पशुसंवर्धन आयुक्तालयामध्ये **ई-ऑफिस** प्रणालीचा वापर नुकताच सुरु केला असून त्याची व्याप्ती वाढविण्यात येत आहे.
- पशुसंवर्धन विभागाचे संकेतस्थळ कार्यरत असून विभागाची अद्यावत माहिती त्यावर उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच विविध योजना व स्वयं रोजगाराच्या दृष्टीने आवश्यक माहिती संकेत स्थळावर अद्यावत केली जाते. ( www.ahd.maharashtra.gov.in )

**Single Platform धोरणाची अंमलबजावणी:**

- विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या वैयक्तिक लाभाच्या विविध योजनांकरीता एकाच platformवरुन अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली अ सून लाभार्थी निवडीच्या याद्या व लाभ दिलेल्या लाभार्थींच्या याद्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येतात.

**Digital Dashboard:**

- विभागा अंतर्गत राबविण्यात येत असलेल्या महत्वाच्या केंद्र पुरस्कृत योजनांची माहिती {INAPH (Information Network for Animal Productivity and Health), NAIP (Nationwide Artificial Insemination Programme), NADCP (National Disease Control Programme), PFMS (Public Finance Management System)} Digital Dashboard वर उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

**१. तक्रार निवारण कक्ष.**

आयुक्त कार्यालयात तक्रार निवारण कक्षाची स्थापना करण्यात आलेली होती, परंतू पशुसंवर्धन विभागाच्या पुनर्रचनेनंतर बरीच पदे निरास झाल्याने (पदे कमी झाल्याने) तक्रार निवारण कक्ष बंद करण्यात आला असून केंद्र शासनाच्या माहितीचा अधिकार कायदा २००५ नुसार माहिती अधिका-यामार्फत आवश्यक कामकाज करण्यात येत आहे.

परिशिष्ट-९

## पशुसंवर्धन विभागामार्फत उपलब्ध होणा-या सःशुल्क सेवा

**विभागाचे नांव :पशुसंवर्धन खाते :**

| अ. क्र. | विभागाकडून / कार्यालयाकडून पुरविली जाणारी सेवा व आकारण्यात येणारे सेवाशुल्क | आवश्यक कागदपत्राची पुर्तता केल्या नंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाईल | सेवा पुरविणारा अधिकारी/कर्मचारी व कार्यालयाचे नांव | सेवा विहित कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांच्या कडे तक्रार करता येईल तो अधिकारी व त्याचा दुरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |

| अ. क्र. | विभागाकडून / कार्यालयाकडून पुरविली जाणारी सेवा व आकारण्यात येणारे सेवाशुल्क | आवश्यक कागदपत्राची पुर्तता केल्या नंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाईल | सेवा पुरविणारा अधिकारी/कर्मचारी व कार्यालयाचे नांव | सेवा विहित कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांच्या कडे तक्रार करता येईल तो अधिकारी व त्याचा दुरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | आजारी जनावरांची तपासणी व उपचार प्रति जनावर-रू १०/-<br>केसपेपर शुल्क.<br>**मोठया शस्त्रक्रियेसाठीशुल्क-**<br>१.कुत्री व मांजरे रु.१५०/- प्रति प्राणि.<br>२. मोठी जनावरे रु.७०/- दारिद्रयरेषेखाली लाभार्थिकरिता रु.५०/- प्रति जनावर<br>३. वासरे, शेळी, मेंढी व इतर रुपये ५०/- दारिद्रयरेषेखाली लाभार्थिकरिता रु.१०/- प्रति जनावर.<br>**लहान शस्त्रक्रियेसाठी शुल्क-**<br>१.कुत्री व मांजरे रु.१००/- प्रति प्राणि.<br>२. मोठी जनावरे रु.५०/- प्रति जनावर (खच्चीकरण वगळून)<br>३. वासरे, शेळी, मेंढी व इतर रुपये २०/- प्रति जनावर. | ही सेवा दवाखान्याच्या कामकाजाच्या वेळात त्याच दिवशी पुरविली जाईल. सेवापुर्तीसाठी लाभार्थि/ पशुपालकांकडून कोणतेही कागदपत्रे आवश्यक नाहीत. | **स्थानिक क्षेत्र :**<br>पशुधन पर्यवेक्षक /सहा. पशुधन विकास अधिकारी जनावरांचा दवाखाना-श्रेणी-२<br>पशुधन विकास अधिकारी जनावरांचा दवाखाना-श्रेणी-१<br>पशुधन विकास अधिकारी फिरता पशुवैद्यकिय दवाखाना.<br>पशुधन पर्यवेक्षक /सहा. पशुधन विकास अधिकारी / पशुधन विकास अधिकारी आधारभुत ग्रामकेंद्रे<br>**राज्य क्षेत्र :**<br>पशुधन पर्यवेक्षक /सहा. पशुधन विकास अधिकारी राज्यस्तरीय पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-२<br>पशुधन विकास अधिकारी राज्यस्तरीय पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१<br>सहाय्यक आयुक्त ,पशुसंवर्धन जिल्हा पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय<br>सहाय्यक आयुक्त ,पशुसंवर्धन तालुका पशुवैद्यकीय लघुसर्वचिकित्सालय | पशुधन विकास अधिकारी (विस्तार), पंचायत समिती<br>जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी (जिल्हा परिषद)<br>जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी (जिल्हा परिषद)<br>जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी (जिल्हा परिषद)<br>सहाय्यक आयुक्त ,पशुसंवर्धन (तालुका पशुवैद्यकीय लघुसर्वचिकित्सालय)<br>सहाय्यक आयुक्त ,पशुसंवर्धन (तालुका पशुवैद्यकीय लघुसर्वचिकित्सालय)<br>जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त ( जिल्हा)<br>जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त ( जिल्हा) |

| अ. क्र. | विभागाकडून / कार्यालयाकडून पुरविली जाणारी सेवा व आकारण्यात येणारे सेवाशुल्क | आवश्यक कागदपत्राची पुर्तता केल्या नंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाईल | सेवा पुरविणारा अधिकारी/कर्मचारी व कार्यालयाचे नांव | सेवा विहित कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांच्या कडे तक्रार करता येईल तो अधिकारी व त्याचा दुरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| **२.** | गायी म्हशीमध्ये कृत्रिम रेतन करणे<br><br>प्रति रेतन :-<br>मुख्यालयी - रू ५०/-<br>शेतक-याचे दारात- रू ५०/ | ही सेवा दवाखान्याच्या कामकाजाच्या वेळात त्याच दिवशी जनावर माजावर असल्यास सशुल्क पुरविली जाईल. दवाखान्याच्या कामकाजाच्या वेळे व्यतिरिक्त शेतकऱ्यांच्या घरी जनावर माजावर असल्यास सशुल्क सेवा पुरविण्यात येईल. सेवापुर्तीसाठी लाभार्थि/ पशुपालकांकडून कोणतेही कागदपत्रे आवश्यक नाहीत. | **स्थानिक क्षेत्र :**<br>पशुधन पर्यवेक्षक /सहा. पशुधन विकास अधिकारी<br>जनावरांचा दवाखाना-श्रेणी-२<br>पशुधन विकास अधिकारी<br>जनावरांचा दवाखाना-श्रेणी-१<br>पशुधन विकास अधिकारी<br>फिरता पशुवैद्यकिय दवाखाना.<br>पशुधन पर्यवेक्षक /सहा. पशुधन विकास अधिकारी /<br>पशुधन विकास अधिकारी<br>आधारभुत ग्रामकेंद्रे<br>**राज्य क्षेत्र :**<br>पशुधन पर्यवेक्षक /सहा. पशुधन विकास अधिकारी /<br>राज्यस्तरीय पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-२<br>पशुधन विकास अधिकारी<br>राज्यस्तरीय पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१<br>सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन<br>जिल्हा पशुवैद्यकिय सर्वचिकित्सालय ú<br>सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन<br>तालुका पशुवैद्यकीयलघुसर्वचिकित्सालय | पशुधन विकास अधिकारी (विस्तार), पंचायत समिती<br><br>जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी (जिल्हा परिषद)<br><br>जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी (जिल्हा परिषद)<br><br>जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी (जिल्हा परिषद)<br><br>सहाय्यक आयुक्त ,पशुसंवर्धन (तालुका पशुवैद्यकीय लघुसर्वचिकित्सालय)<br><br>सहाय्यक आयुक्त ,पशुसंवर्धन (तालुका पशुवैद्यकीय लघुसर्वचिकित्सालय)<br>जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त ( जिल्हा)<br><br>जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त ( जिल्हा) |

| अ. क्र. | विभागाकडून / कार्यालयाकडून पुरविली जाणारी सेवा व आकारण्यात येणारे सेवाशुल्क | आवश्यक कागदपत्राची पुर्तता केल्या नंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाईल | सेवा पुरविणारा अधिकारी/कर्मचारी व कार्यालयाचे नांव | सेवा विहित कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांच्या कडे तक्रार करता येईल तो अधिकारी व त्याचा दुरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| **३.** | गायी म्हशीना गर्भ धारणा तपासणी<br><br>प्रति तपासणी -रू १०/-<br>(कृत्रीम रेतना व्यतिरिक्त) | ही सेवा दवाखान्याच्या कामकाजाच्या वेळात त्याच दिवशी पुरविली जाईल. दवाखान्याच्या कामकाजाच्या वेळेव्यतिरिक्त अत्यावश्यक कामकाजानंतर सशुल्क सेवा दिली जाईल. सेवापुर्तीसाठी लाभार्थि/ पशुपालकांकडून कोणतेही कागदपत्रे आवश्यक नाहीत. | **स्थानिक क्षेत्र :**<br>पशुधन पर्यवेक्षक /सहा. पशुधन विकास अधिकारी जनावरांचा दवाखाना-श्रेणी-२<br><br>पशुधन विकास अधिकारी<br>जनावरांचा दवाखाना-श्रेणी-१<br><br>पशुधन विकास अधिकारी<br>फिरता पशुवैद्यकिय दवाखाना.<br><br>पशुधन पर्यवेक्षक /<br>सहा. पशुधन विकास अधिकारी /<br>पशुधन विकास अधिकारी<br>आधारभुत ग्रामकेंद्रे<br>**राज्य क्षेत्र :**<br><br>पशुधन पर्यवेक्षक /सहा. पशुधन विकास अधिकारी /राज्यस्तरीय पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-२<br>पशुधन विकास अधिकारी<br>राज्यस्तरीय पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१<br>सहाय्यक आयुक्त,पशुसंवर्धन<br>जिल्हा पशुवैद्यकिय सर्वचिकित्सालय ü<br>सहाय्यक आयुक्त,पशुसंवर्धन<br>तालुका पशुवैद्यकीय लघुसर्वचिकित्सालय | पशुधन विकास अधिकारी (विस्तार), पंचायत समिती<br><br>जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी (जिल्हा परिषद)<br><br>जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी (जिल्हा परिषद)<br><br>जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी (जिल्हा परिषद)<br><br>सहाय्यक आयुक्त ,पशुसंवर्धन (तालुका पशुवैद्यकीय लघुसर्वचिकित्सालय)<br><br>सहाय्यक आयुक्त ,पशुसंवर्धन (तालुका पशुवैद्यकीय लघुसर्वचिकित्सालय)<br>जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त ( जिल्हा)<br><br>जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त ( जिल्हा) |

| अ. क्र. | विभागाकडून / कार्यालयाकडून पुरविली जाणारी सेवा व आकारण्यात येणारे सेवाशुल्क | आवश्यक कागदपत्राची पुर्तता केल्या नंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाईल | सेवा पुरविणारा अधिकारी/कर्मचारी व कार्यालयाचे नांव | सेवा विहित कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांच्या कडे तक्रार करता येईल तो अधिकारी व त्याचा दुरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| ४. | गायी म्हशींची वंध्यत्व तपासणी<br><br>प्रति तपासणी -रू १०/- | ही सेवा दवाखान्याच्या कामकाजाच्या वेळात त्याच दिवशी सशुल्क पुरविली जाईल.<br>दवाखाना कामकाजाच्या वेळा व्यतिरिक्त आत्यावश्यक कामकाजा नंतर सशुल्क सेवा पुरविली जाईल.<br>सेवापुर्तीसाठी लाभार्थि/ पशुपालकांकडून कोणतेही कागदपत्रे आवश्यक नाहीत. | **स्थानिक क्षेत्र**<br>पशुधन पर्यवेक्षक:<br>सहा. पशुधन विकास अधिकारी जनावरांचा दवाखाना श्रेणी-२<br>पशुधन विकास अधिकारी<br>जनावरांचा दवाखाना-श्रेणी-१<br>पशुधन विकास अधिकारी<br>फिरता पशुवैद्यकिय दवाखाना.<br>पशुधन पर्यवेक्षक:/<br>सहा. पशुधन विकास अधिकारी/<br>पशुधन विकास अधिकारी<br>आधारभुत ग्रामकेंद्रे<br><br>**राज्य क्षेत्र** :<br>पशुधन पर्यवेक्षक:<br>सहा. पशुधन विकास अधिकारी राज्यस्तरीय पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-२<br>पशुधन विकास अधिकारी<br>राज्यस्तरीय पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-२<br><br>सहाय्यक आयुक्त ,पशुसंवर्धन<br>जिल्हा पशुवैद्यकिकय सर्वचिकित्सालय<br>सहाय्यक आयुक्त,पशुसंवर्धन<br>तालुका पशुवैद्यकीय लघुसर्वचिकित्सालय | पशुधन विकास अधिकारी (विस्तार), पंचायत समिती<br><br>जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी (जिल्हा परिषद)<br><br>जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी (जिल्हा परिषद)<br><br>जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी (जिल्हा परिषद)<br><br>सहाय्यक आयुक्त,पशुसंवर्धन (तालुका पशुवैद्यकीय लघुसर्वचिकित्सालय)<br>सहाय्यक आयुक्त,पशुसंवर्धन (तालुका पशुवैद्यकीय लघुसर्वचिकित्सालय)<br><br>जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त ( जिल्हा)<br><br>जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त ( जिल्हा) |

| अ. क्र. | विभागाकडून / कार्यालयाकडून पुरविली जाणारी सेवा व आकारण्यात येणारे सेवाशुल्क | आवश्यक कागदपत्राची पुर्तता केल्या नंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाईल | सेवा पुरविणारा अधिकारी/कर्मचारी व कार्यालयाचे नांव | सेवा विहित कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांच्या कडे तक्रार करता येईल तो अधिकारी व त्याचा दुरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| ५. | जनावरांना / कोंबडयांना लसीकरण<br><br>प्रति जनावर प्रति लस- रू १/-<br>प्रति पक्षी प्रति लस- रू. १/- | ही सेवा दवाखान्याच्या कामकाजाच्या वेळात ठरवून दिलेल्या दिवशी सशुल्क पुरविली जाईल. खाजगी कुक्कुट प्रक्षेत्रावर दवाखान्याच्या वेळेव्यतिरिक्त सशुल्क सेवा उपलब्ध होईल. सेवापुर्तीसाठी लाभार्थि/ पशुपालकांकडून कोणतेही कागदपत्रे आवश्यक नाहीत. | **स्थानिक क्षेत्र :**<br>पशुधन पर्यवेक्षक<br>सहा. पशुधन विकास अधिकारी जनावरांचा दवाखाना-श्रेणी-२<br>पशुधन विकास अधिकारी जनावरांचा दवाखाना-श्रेणी-१<br>पशुधन विकास अधिकारी<br>फिरता पशुवैद्यकिय दवाखाना.<br>पशुधन विकास अधिकारी<br>सघन कुक्कुट विकास गट<br>पशुधन पर्यवेक्षक /<br>सहा. पशुधन विकास अधिकारी /<br>पशुधन विकास अधिकारी आधारभुत ग्रामकेंद्रे<br><br>**राज्य क्षेत्र :**<br><br>पशुधन पर्यवेक्षक /सहा. पशुधन विकास अधिकारी /<br>राज्यस्तरीय पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-२<br>पशुधन विकास अधिकारी<br>राज्यस्तरीय पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१<br>सहाय्यक आयुक्त ,पशुसंवर्धन<br>जिल्हा पशुवैद्यकिय सर्वचिकित्सालय ÿ<br>सहाय्यक आयुक्त ,पशुसंवर्धन<br>तालुका पशुवैद्यकीय लघुसर्वचिकित्सालय | पशुधन विकास अधिकारी (विस्तार), पंचायत समिती<br><br>जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी (जिल्हा परिषद)<br><br>जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी (जिल्हा परिषद)<br><br>जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी (जिल्हा परिषद)<br><br>जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी (जिल्हा परिषद)<br><br>सहाय्यक आयुक्त,पशुसंवर्धन (तालुका पशुवैद्यकीय लघुसर्वचिकित्सालय)<br>सहाय्यक आयुक्त,पशुसंवर्धन (तालुका पशुवैद्यकीय लघुसर्वचिकित्सालय)<br><br>जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त ( जिल्हा<br><br>जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त ( जिल्हा) |

| अ. क्र. | विभागाकडून / कार्यालयाकडून पुरविली जाणारी सेवा व आकारण्यात येणारे सेवाशुल्क | आवश्यक कागदपत्राची पुर्तता केल्या नंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाईल | सेवा पुरविणारा अधिकारी/कर्मचारी व कार्यालयाचे नांव | सेवा विहित कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांच्या कडे तक्रार करता येईल तो अधिकारी व त्याचा दुरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| **६.** | बेरड वळूंचे खच्चीकरण<br><br>प्रति जनावर-रू १०/- | ही सेवा दवाखान्याच्या कामकाजाच्या वेळात त्याच दिवशी सशुल्क पुरविली जाईल. तसेच कृति शिबीरात सोय उपलब्ध होवू शकेल.<br>सेवापुर्तीसाठी लाभार्थि/ पशुपालकांकडून कोणतेही कागदपत्रे आवश्यक नाहीत. | **स्थानिक क्षेत्र :**<br>पशुधन पर्यवेक्षक /<br>सहा. पशुधन विकास अधिकारी जनावरांचा दवाखाना-श्रेणी-२<br>पशुधन विकास अधिकारी<br>जनावरांचा दवाखाना-श्रेणी-१<br>पशुधन विकास अधिकारी<br>फिरता पशुवैद्यकिय दवाखाना.<br>पशुधन पर्यवेक्षक /<br>सहा. पशुधन विकास अधिकारी<br>आधारभुत ग्रामकेंद्रे<br><br>**राज्य क्षेत्र :**<br><br>पशुधन पर्यवेक्षक /सहा. पशुधन विकास अधिकारी /<br>राज्यस्तरीय पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-२<br>पशुधन विकास अधिकारी<br>राज्यस्तरीय पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१<br>सहाय्यक आयुक्त ,पशुसंवर्धन<br>जिल्हा पशुवैद्यकिय सर्वचिकित्सालय ü<br>सहाय्यक आयुक्त ,पशुसंवर्धन<br>तालुका पशुवैद्यकीय लघुसर्वचिकित्सालय | पशुधन विकास अधिकारी (विस्तार), पंचायत समिती<br><br>जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी (जिल्हा परिषद)<br><br>जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी (जिल्हा परिषद)<br><br>जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी (जिल्हा परिषद)<br><br>सहाय्यक आयुक्त,पशुसंवर्धन (तालुका पशुवैद्यकीय लघुसर्वचिकित्सालय)<br><br>सहाय्यक आयुक्त,पशुसंवर्धन (तालुका पशुवैद्यकीय लघुसर्वचिकित्सालय)<br>जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त ( जिल्हा<br><br>जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त ( जिल्हा) |

| अ. क्र. | विभागाकडून / कार्यालयाकडून पुरविली जाणारी सेवा व आकारण्यात येणारे सेवाशुल्क | आवश्यक कागदपत्राची पुर्तता केल्या नंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाईल | सेवा पुरविणारा अधिकारी/कर्मचारी व कार्यालयाचे नांव | सेवा विहित कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांच्या कडे तक्रार करता येईल तो अधिकारी व त्याचा दुरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| **७.** | पशुरूग्णांची रक्त ,शेण व मलमुत्र तपासणी अहवाल<br><br>रक्त-प्रति तपासणी - रू १०/-<br>रक्त काच पट्टया तपासणी- रू १०/-<br>शेण,मुत्र- प्रति तपासणी - रू १०/- | ही सेवा दवाखान्याच्या कामकाजाच्या वेळात पुरविण्यात येईल. नमुना मिळाल्या नंतर दूस-या दिवशी रोगाचे नमुने व मलमुत्र याचे तपासणी अहवाल पुरविला जाईल आणि रक्त काच पट्टया तपासणी अहवाल ८ दिवसा नंतर दिला जाईल. सेवापुर्तीसाठी लाभार्थि/ पशुपालकांकडून कोणतेही कागदपत्रे आवश्यक नाहीत. | **स्थानिक क्षेत्र** :<br>पशुधन विकास अधिकारी<br>जनावरांचा दवाखाना श्रेणी-१<br><br>पशुधन विकास अधिकारी<br>आधारभूत ग्राम उपकेन्द्र<br><br>**राज्य क्षेत्र :**<br><br>सहआयुक्त पशुसंवर्धन<br>रोग अन्वेषण विभाग<br><br>सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन<br>विभागीय रोग अन्वेषण प्रयोगशाळा<br><br>पशुधन विकास अधिकारी<br>राज्यस्तरीय पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१<br>सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन<br>जिल्हा पशुवैद्यकिय सर्वचिकित्सालय<br>सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन<br>तालुका पशुवैद्यकीय लघुसर्वचिकित्सालय | जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी (जिल्हा परिषद)<br><br>जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी (जिल्हा परिषद)<br><br>आयुक्त पशुसंवर्धन<br><br>जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त ( जिल्हा)<br><br>सहाय्यक आयुक्त,पशुसंवर्धन (तालुका पशुवैद्यकीय लघुसर्वचिकित्सालय)<br><br>जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त ( जिल्हा )<br><br>जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त ( जिल्हा ) |

| अ. क्र. | विभागाकडून / कार्यालयाकडून पुरविली जाणारी सेवा व आकारण्यात येणारे सेवाशुल्क | आवश्यक कागदपत्राची पुर्तता केल्या नंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाईल | सेवा पुरविणारा अधिकारी/कर्मचारी व कार्यालयाचे नांव | सेवा विहित कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांच्या कडे तक्रार करता येईल तो अधिकारी व त्याचा दुरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| ८. | जनावरांना स्वास्थ्याचा दाखला देणे<br><br>प्रति मोठे जनावर- रू ५०/-<br>प्रति लहान जनावर- रू २०/- | जनावरांची प्रत्यक्ष तपासणी करून þ पुढील दिवशी मागणी केल्यानुसार व देय सेवाशुल्क भरल्यानंतर. दाखला दिला जाईल. | **स्थानिक क्षेत्र :**<br>पशुधन पर्यवेक्षक /<br>सहा. पशुधन विकास अधिकारी<br>जनावरांचा दवाखाना-श्रेणी-२<br>पशुधन विकास अधिकारी<br>जनावरांचा दवाखाना-श्रेणी-१<br>पशुधन विकास अधिकारी<br>फिरता पशुवैद्यकिय दवाखाना.<br>पशुधन पर्यवेक्षक /<br>सहा. पशुधन विकास अधिकारी आधारभुत ग्रामकेंद्रे<br>पशुधन विकास अधिकारी (विस्तार)<br>पशुसंवर्धन विस्तार कक्ष पंचायत समिती स्तर<br><br>**राज्य क्षेत्र** :<br><br>पशुधन पर्यवेक्षक /सहा. पशुधन विकास अधिकारी /<br>राज्यस्तरीय पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-२<br>पशुधन विकास अधिकारी<br>राज्यस्तरीय पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१<br>सहाय्यक आयुक्त ,पशुसंवर्धन<br>जिल्हा पशुवैद्यकिय सर्वचिकित्सालय ü<br>सहाय्यक आयुक्त ,पशुसंवर्धन<br>तालुका पशुवैद्यकीय लघुसर्वचिकित्सालय | पशुधन विकास अधिकारी (विस्तार), पंचायत समिती<br><br>जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी (जिल्हा परिषद)<br><br>जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी (जिल्हा परिषद)<br><br>जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी (जिल्हा परिषद)<br><br>जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी (जिल्हा परिषद)<br><br>सहाय्यक आयुक्त,पशुसंवर्धन (तालुका पशुवैद्यकीय लघुसर्वचिकित्सालय)<br>सहाय्यक आयुक्त,पशुसंवर्धन (तालुका पशुवैद्यकीय लघुसर्वचिकित्सालय)<br><br>जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त ( जिल्हा<br><br>जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त ( जिल्हा) |

| अ. क्र. | विभागाकडून / कार्यालयाकडून पुरविली जाणारी सेवा व आकारण्यात येणारे सेवाशुल्क | आवश्यक कागदपत्राची पुर्तता केल्या नंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाईल | सेवा पुरविणारा अधिकारी/कर्मचारी व कार्यालयाचे नांव | सेवा विहित कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांच्या कडे तक्रार करता येईल तो अधिकारी व त्याचा दुरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| ९. | अनुसूचित यादीमधील जनावरांच्या कत्तलीसाठी प्रमाणपत्र<br><br>प्रति जनावर-रू २००/- | दवाखान्याच्या कामकाजाच्या वेळात विहीत दिवशी जनावरांची प्रत्यक्ष तपासणी करून दाखला दिला जाईल. सेवापुर्तीसाठी लाभार्थि/ पशुपालकांकडून कोणतेही कागदपत्रे आवश्यक नाहीत. | **स्थानिक क्षेत्र :**<br><br>पशुधन विकास अधिकारी,<br>जनावरांचा दवाखाना-श्रेणी-१<br><br>**राज्य क्षेत्र :**<br><br>सहाय्यक आयुक्त ,पशुसंवर्धन<br>पशुधन विकास अधिकारी,<br>पशुवैद्यकिय सर्वचिकित्सालय<br><br>सहाय्यक आयुक्त ,पशुसंवर्धन<br>पशुधन विकास अधिकारी,<br>तालुका पशुवैद्यकीय लघुसर्वचिकित्सालय<br><br>पशुधन विकास अधिकारी,<br>जेथे कत्तलीची संख्या जास्त असेल तेथील विशेष कक्ष . | जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी (जिल्हा परिषद)<br><br>जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त ( जिल्हा<br><br>जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त ( जिल्हा)<br><br>सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन (पवैसचि)/<br>जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त पुणे. |

| अ. क्र. | विभागाकडून / कार्यालयाकडून पुरविली जाणारी सेवा व आकारण्यात येणारे सेवाशुल्क | आवश्यक कागदपत्राची पुर्तता केल्या नंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाईल | सेवा पुरविणारा अधिकारी/कर्मचारी व कार्यालयाचे नांव | सेवा विहित कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांच्या कडे तक्रार करता येईल तो अधिकारी व त्याचा दुरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| **१०.** | जनावरे व कुक्कुट पक्ष्यांचे शव विच्छेदन करून तपासणी करणे व दाखला देणे.<br>१.प्रति जनावर-<br>रू.१००/- | शव विच्छेदनानंतर एका दिवसात दाखला दिला जाईल.<br>सेवापुर्तीसाठी प्रसंगानुरूप लाभार्थि/ पशुपालकांकडून अर्ज घेणे आवश्यक आहे. | **स्थानिक क्षेत्र** :<br>पशुधन विकास अधिकारी<br>जनावरांचा दवाखाना-श्रेणी-१<br>पशुधन विकास अधिकारी<br>फिरता पशुवैद्यकिय दवाखाना.<br>पशुधन विकास अधिकारी<br>आधारभुत ग्रामकेंद्रे -श्रेणी-१<br>**राज्य क्षेत्र :**<br>सहाय्यक आयुक्त ,पशुसंवर्धन<br>जिल्हा पशुवैद्यकिय सर्वचिकित्सालय ὐ<br>सहाय्यक आयुक्त ,पशुसंवर्धन<br>तालुका पशुवैद्यकीय लघुसर्वचिकित्सालय<br>पशुधन विकास अधिकारी<br>राज्यस्तरीय पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१ | जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी (जिल्हा परिषद)<br>जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी (जिल्हा परिषद)<br>जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी (जिल्हा परिषद)<br>जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त ( जिल्हा<br>जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त ( जिल्हा)<br>सहाय्यक आयुक्त,पशुसंवर्धन (तालुका पशुवैद्यकीय लघुसर्वचिकित्सालय) |

| अ. क्र. | विभागाकडून / कार्यालयाकडून पुरविली जाणारी सेवा व आकारण्यात येणारे सेवाशुल्क | आवश्यक कागदपत्राची पुर्तता केल्या नंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाईल | सेवा पुरविणारा अधिकारी/कर्मचारी व कार्यालयाचे नांव | सेवा विहित कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांच्या कडे तक्रार करता येईल तो अधिकारी व त्याचा दुरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| **११.** | जनावरांना सर्पदंश किंवा श्वानदंश झाल्यास त्यावर उपचार व मार्गदर्शन<br>केस पेपर फी<br>प्रति जनावर-रू १०/-<br>ॲन्टीरॅबीज/<br>अँटीव्हेनोम लसीकरणाचे शुल्क स्वत: पशुपालकांनी भरावे. | आवश्यक असलेली लस /अँटीव्हेनोम<br>(विषबाधा प्रतिबंधक लस)<br>पशुपालकांना उपलब्ध करून दिल्यानंतर तात्काळ उपचार व मार्गदर्शन केले जाईल.<br>सेवापुर्तीसाठी लाभार्थि/ पशुपालकांकडून कोणतेही कागदपत्रे आवश्यक नाहीत. | **स्थानिक क्षेत्र :**<br><br>पशुधन पर्यवेक्षक /<br>सहा. पशुधन विकास अधिकारी<br>जनावरांचा दवाखाना-श्रेणी-२<br><br>पशुधन विकास अधिकारी<br>जनावरांचा दवाखाना-श्रेणी-१<br><br>पशुधन विकास अधिकारी<br>आधारभुत ग्रामकेंद्रे<br>फिरता पशुवैद्यकिय दवाखाना.<br>पशुधन पर्यवेक्षक /<br>सहा. पशुधन विकास अधिकारी /<br>पशुधन विकास अधिकारी<br><br>**राज्य क्षेत्र :**<br>पशुधन पर्यवेक्षक /सहा. पशुधन विकास अधिकारी /<br>राज्यस्तरीय पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-२<br>पशुधन विकास अधिकारी<br>राज्यस्तरीय पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१<br><br>सहाय्यक आयुक्त ,पशुसंवर्धन<br>जिल्हा पशुवैद्यकिय सर्वचिकित्सालय ù<br>सहाय्यक आयुक्त ,पशुसंवर्धन<br>तालुका पशुवैद्यकीय लघुसर्वचिकित्सालय | पशुधन विकास अधिकारी (विस्तार), पंचायत समिती<br><br>जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी (जिल्हा परिषद)<br><br>जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी (जिल्हा परिषद)<br><br>जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी (जिल्हा परिषद)<br><br>सहाय्यक आयुक्त,पशुसंवर्धन (तालुका पशुवैद्यकीय लघुसर्वचिकित्सालय)<br><br>सहाय्यक आयुक्त,पशुसंवर्धन (तालुका पशुवैद्यकीय लघुसर्वचिकित्सालय)<br><br>जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त ( जिल्हा<br><br>जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त ( जिल्हा) |

| अ. क्र. | विभागाकडून / कार्यालयाकडून पुरविली जाणारी सेवा व आकारण्यात येणारे सेवाशुल्क | आवश्यक कागदपत्राची पुर्तता केल्या नंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाईल | सेवा पुरविणारा अधिकारी/कर्मचारी व कार्यालयाचे नांव | सेवा विहित कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांच्या कडे तक्रार करता येईल तो अधिकारी व त्याचा दुरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| **१२.** | लाभार्थींना कुक्कुटपालनाचे प्रशिक्षण देणे<br><br>१५ दिवसांचा- रू १००/-<br>१ महिना - रू २००/-<br>६ महिने - रू ५००/-(प्रति लाभार्थी) | आयोजित केलेल्या शिबिराच्या कार्यक्रमानुसार नोंदणी केल्या नंतर १५ दिवसात प्रशिक्षण दिले जाईल. नोंदणी केल्यानंतर सुरु होणाऱ्या पहिल्या/ दुसऱ्या तुकडी मध्ये प्रशिक्षण दिले जाईल. लाभार्थिंचा अर्ज, आवश्यकतेनुसार जातीचा दाखला, शालांत परिक्षा उत्तीर्ण झाल्याचा दाखला, ही कागदपत्र आवश्यक. एकूण लाभार्थीपैकी ३० टक्के लाभार्थी महिला असतील याची निश्चिती करण्यात येईल. | **स्थानिक क्षेत्र :**<br><br>पशुधन विकास अधिकारी<br>सघन कुक्कुट विकास गट.<br><br>**राज्य क्षेत्र :**<br><br>पशुधन विकास अधिकारी<br>१.कुक्कुट प्रशिक्षण केंद्र मुरूड जि. लातूर.<br>पशुधन विकास अधिकारी<br>२.कुक्कुट प्रशिक्षण केंद्र कणकवली जि. सिंधुदूर्ग .<br>पशुधन विकास अधिकारी<br>३. कुक्कुट प्रशिक्षण केंद्र पुणे जि. पुणे.<br>पशुधन विकास अधिकारी<br>४.कुक्कुट प्रशिक्षण केंद्र कोल्हापूर जि. कोल्हापूर.<br>पशुधन विकास अधिकारी<br>५.कुक्कुट प्रशिक्षण केंद्र अमरावती जि. अमरावती.<br>पशुधन विकास अधिकारी<br>६.कुक्कुट प्रशिक्षण केंद्र नागपूर जि. नागपूर. | जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी (जिल्हा परिषद)<br><br>जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त लातूर<br><br>जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त सिंधदूर्ग<br><br>जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त पुणे.<br><br>जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त कोल्हापूर.<br><br>जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त अमरावती.<br><br>जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त नागपूर. |

| अ. क्र. | विभागाकडून / कार्यालयाकडून पुरविली जाणारी सेवा व आकारण्यात येणारे सेवाशुल्क | आवश्यक कागदपत्राची पुर्तता केल्या नंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाईल | सेवा पुरविणारा अधिकारी/कर्मचारी व कार्यालयाचे नांव | सेवा विहित कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांच्या कडे तक्रार करता येईल तो अधिकारी व त्याचा दुरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| **१३.** | सुशिक्षीत बेरोजगार युवकांना स्वंरोजगारीसाठी प्रशिक्षण देण्याच्या कार्यक्रमा अंतर्गत<br>१.दुधाळ जनावरांचे व्यवस्थापन (१आठवडा)<br>२.शेळी/मेंढी पालन (१ आठवडा)<br>३.कुक्कुट पालन (१ आठवडा)<br>४.बदक पालन आठवडा)<br>५.ससा पालन (१ आठवडा)<br>६.वराह संवर्धन (१ आठवडा)<br>७.वैरण उत्पादन (२ आठवडे)<br>८.कृत्रिम रेतन प्रशिक्षण (१ महिना)<br>अ.क्र. १ ते ६ साठी प्रशिक्षण शुल्क रू.२००/-प्रति प्रशिक्षणार्थी (अमागास)व रू.१००/- प्रति प्रशिक्षणार्थी (मागास). अ.क्र.७ व ८ साठी प्रशिक्षण शुल्क रू.५००/- व रू.१०००/-अनुक्रमे. | इच्छूक व्यक्तींनी संबंधीत प्रशिक्षण आयोजीत करणा-या अधिका-याशी संपर्क साधून नियोजीत बॅचमध्ये नावांची नोंदणी करावी. सदर प्रशिक्षण ग्रामीणस्तर किंवा तालुका (पंचायत समिती) स्तरावर पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालये/ जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त कार्यालय / मध्यवर्ती अंडी उबवणी केंद्रे/ सधन कुक्कुट विकास गट येथे देण्यात येईल. प्रशिक्षणार्थीचे वय १८ ते ३५ दरम्यान असावे, सेवायोजन कार्यालयात नांव नोंदणी केलेली असावी. आणि शिक्षण किमान इयत्ता चौथी पासून पुढे असावे. प्रत्येक तुकडी मध्ये २५ ते ४० लाभार्थिंना प्रशिक्षण शुल्क अदा केल्यानंतर प्रशिक्षण दिले जाईल. | **स्थानिक क्षेत्र :**<br>पशुधन विकास अधिकारी जनावरांचा दवाखाना-श्रेणी-१<br>पशुधन विकास अधिकारी आधारभुत ग्राम केंद्रे, श्रेणी-१.<br>पशुधन विकास अधिकारी सधन कुक्कुट विकास गट<br>राज्य क्षेत्र :<br>पशुधन विकास अधिकारी राज्यस्तरीय पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१<br>सहाय्यक आयुक्त ,पशुसंवर्धन जिल्हा पशुवैद्यकिय सर्वचिकित्सालय<br>सहाय्यक आयुक्त ,पशुसंवर्धन तालुका पशुवैद्यकीय लघुसर्वचिकित्सालय<br>सहाय्यक आयुक्त ,पशुसंवर्धन मध्यवर्ती अंडी उबवणी केंद्र<br>जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त ( जिल्हा) | जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी (जिल्हा परिषद)<br>जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी (जिल्हा परिषद)<br>जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी (जिल्हा परिषद)<br>सहाय्यक आयुक्त,पशुसंवर्धन (तालुका पशुवैद्यकीय लघुसर्वचिकित्सालय)<br>जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त ( जिल्हा<br>जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त ( जिल्हा)<br>जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त ( जिल्हा)<br>प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त |

| अ. क्र. | विभागाकडून / कार्यालयाकडून पुरविली जाणारी सेवा व आकारण्यात येणारे सेवाशुल्क | आवश्यक कागदपत्राची पुर्तता केल्या नंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाईल | सेवा पुरविणारा अधिकारी/कर्मचारी व कार्यालयाचे नांव | सेवा विहित कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांच्या कडे तक्रार करता येईल तो अधिकारी व त्याचा दुरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| **१४.** | पशु व कुक्कुट खाध विश्लेषण<br>विश्लेषण घटकानुसार रू २०/- ते रू २५०/- पर्यंत शुल्क आकारण्यात येइल | विश्लेषण नमुने प्राप्त झाल्यानंतर १५ दिवसात अहवाल दिला जाईल. | **राज्य क्षेत्र :**<br>सहाय्यक आयुक्त,पशुसंवर्धन विश्लेषण प्रयोगशाळा ,पुणे-१६ | प्रदेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन पुणे |

| अ. क्र. | विभागाकडून / कार्यालयाकडून पुरविली जाणारी सेवा व आकारण्यात येणारे सेवाशुल्क | आवश्यक कागदपत्राची पुर्तता केल्या नंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाईल | सेवा पुरविणारा अधिकारी/कर्मचारी व कार्यालयाचे नांव | सेवा विहित कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांच्या कडे तक्रार करता येईल तो अधिकारी व त्याचा दुरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १५ | जनावरांना केलेल्या लसीकरणाचा दाखला<br><br>मोफत दिला जाईल | ही सेवा दवाखान्याच्या कामकाजाच्या वेळात मागणी नुसार दुस-या दिवशी पुरविली जाईल. सेवापुर्तीसाठी लाभार्थि/ पशुपालकांकडून कोणतेही कागदपत्रे आवश्यक नाहीत. | **स्थानिक क्षेत्र :**<br>पशुधन पर्यवेक्षक<br>सहा. पशुधन विकास अधिकारी<br>जनावरांचा दवाखाना-श्रेणी-२<br><br>पशुधन विकास अधिकारी<br>जनावरांचा दवाखाना-श्रेणी-१<br><br>पशुधन विकास अधिकारी/<br>पशुधन पर्यवेक्षक /<br>सहा. पशुधन विकास अधिकारी<br>आधारभुत ग्रामकेंद्र<br><br>**राज्य क्षेत्र :**<br><br>पशुधन पर्यवेक्षक /सहा. पशुधन विकास अधिकारी /पशुधन विकास अधिकारी<br>पशुवैद्यकिय दवाखाना श्रेणी-२<br>पशुधन विकास अधिकारी<br>जनावरांचा दवाखाना-श्रेणी-१<br><br>सहाय्यक आयुक्त,पशुसंवर्धन<br>पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय<br><br>सहाय्यक आयुक्त,पशुसंवर्धन तालुका लघुपशुचिकीत्सालय . | पशुधन विकास अधिकारी (विस्तार), पंचायत समिती<br><br>जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी (जिल्हा परिषद)<br><br>जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी (जिल्हा परिषद)<br><br>सहाय्यक आयुक्त,पशुसंवर्धन तालुका लघुपशुचिकीत्सालय .<br><br>सहाय्यक आयुक्त,पशुसंवर्धन तालुका लघुपशुचिकीत्सालय .<br><br>जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त( जिल्हा)<br><br>जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त( जिल्हा) |

( महाराष्ट्र शासन )

पशुसंवर्धन विभाग

# नागरीकांची सनद/ सिटिझन चार्टर

पशुसंवर्धन आयुक्तालय
महाराष्ट्र राज्य, औंध,
पुणे-४११ ०६७